बुधवार, 19 ऑक्टोबर 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक -73
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • WEDNESDAY 19 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-73 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-12 • PRICE-5

## पुण्यात पावसाचा हाहाकार



परतीच्या पावसाने पुण्यात अक्षरशः हाहाकार माजला. काल रात्री पाऊणेदहाच्या सुमारास सुरु झालेला पाऊस रात्रभर कोसळत होता. त्यामुळे पुण्यात सर्वत्र पाणीच पाणी झाले आणि पुणेकरांची त्रेधातिरपीट उडाली.

### चर्चेतली बातमी

## बीसीसीआय अध्यक्षपदी रॉजर बिन्नी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी माजी क्रिकेटपटू रॉजर बिन्नी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आज बीसीसीआयची वार्षिक सर्वसाधारण पार पडली. या सभेत बिन्नी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. बिन्नी सौरव गांगुली यांच्याकडून अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारतील. विशेष म्हणजे जय शाह हे सचिवपदी कायम असतील. आयसीसी'च्या अध्यक्षपदासाठी केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर आणि माजी 'बीसीसीआय' अध्यक्ष एन. श्रीनिवासन यांच्याही नावांची चर्चा होती. श्रीनिवासन या पदासाठी पात्रही ठरत होते. मात्र, श्रीनिवास यांचे वय ७८ वर्षे असून त्यांच्या उमेदवारीला 'बीसीसीआय'कडून पाठिंबा मिळण्याबाबत साशंकता व्यक्त करण्यात आली होती. दुसरीकडे अनुराग ठाकूर हिमाचल प्रदेशातील निवडणुकीत व्यग्र असण्याची शक्यता असल्यामुळे त्यांचे नावही वगळण्यात आले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. बीसीसीआयच्या अध्यक्षपदी रॉजर बिन्नी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर उपाध्यक्षपदी राजीव शुक्ला असतील. सचिवपदी जय शाह यांना कायम ठेवण्यात आले आहे.

## सहा रबी पिकांचा हमी भाव वाढवला


### गव्हाच्या किमतीत 110 तर मसूरमध्ये 500 रुपयांची वाढ; कॅबिनेटचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : केंद्र सरकारने येत्या रबी पिकांचे किमान हमी भाव म्हणजे एमएसपी जाहीर केले आहेत. गव्हाची एमएसपी 2015 रुपयांवरुन 2125 क्विंटल म्हणजे 110 रुपयांनी वाढवली आहे. तर हरभऱ्याचा एमएसपी 1635 वरुन 1735 म्हणजे 105 रुपयांनी वाढवण्यास केंद्रिय कॅबिनेटने मान्यता दिली आहे.**

गहू, हरभऱ्याप्रमाणेच इतर महत्वाच्या सहा रबी पिकांचा एमएसपी वाढवला आहे. मसूरचा एमएसपी सर्वाधिक 500 रुपये वाढून 6 हजार रुपये क्विंटल झाली आहे. तर मोहरीचा एमएसपी 400 रुपयांनी वाढवला आहे. करडईचा एमएसपी 5 हजार 441 होता. तो 209 रुपयांनी वाढून 5 हजार 650 रुपये क्विंटल झाली आहे. सन 2023-24 सालासाठी सहा रबी पिकांच्या किमान हमी भावाच्या वाढीला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असल्याचे केंद्रीय मंत्री अनुराग ठाकुर यांनी सांगितले. त्यानुसार मसूरच्या किमतीत दर क्विंटलमागे 500 रुपयांची वाढ करण्यात आली आहे. तर गव्हाच्या किमतीत 110 रुपायांची वाढ करण्यात आली आहे. चना किमतीत 105 रुपयांची तर मोहरीच्या किमतीत 400 रुपयांची वाढ करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या पिकांच्या किमतीमध्ये मोठी वाढ करण्यात आल्याचे केंद्र सरकारने सांगितले आहे.





**एमएसपी कोण ठरवते?**
खरीप आणि रबी पिकाचा एमएसपी वर्षातून दोनदा ठरवला जातो, कृषी खर्च आणि किमती आयोग म्हणजे सीएसीपी या संबंधित केंद्र सरकारकडे शिफारस करतो. त्या आधारे दरवर्षी तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया आणि आणि इतर पिकांचा एमएसपी घोषित केला जातो. या शिफारशी लक्षात घेऊन सरकार एमएसपी जाहीर करते. किती पिकांसाठी एमएसपी जाहीर केला जातो?
CACP कडून सध्या 23 पिकांसाठी एमएसपी जाहीर केला जातो. त्यामध्ये 7 अन्नधान्य पिके, 5 डाळी, 7 तेल बिया आणि 4 व्यावसायिक पिकांसाठी सध्या एमएसपी जाहीर केला जातोय.

**एमएसपी म्हणजे काय?**
एमएसपी ( MSP ) म्हणजे किमान हमी भाव किंवा किमान आधारभूत किंमत. या किमतीला सरकार शेतकऱ्यांकडून त्यांच्या पिकांची खरेदी करते. एकदा का एखाद्या पिकाला किमान हमी भाव जाहीर केला तर त्या किमतीखाली त्या पिकाची खरेदी करता येत नाही. किमान तेवढ्या किमतीला संबंधित पीक खरेदी करणे सरकारला बंधनकारक असते. किमान हमीभावामुळे शेतकऱ्यांना एक प्रकारचे आश्वासन मिळते, दिलासा मिळतो.


## सरकारी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारकडून दिवाळीचे गिफ्ट

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारच्या सेवेतील अधिकारी, कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांना दिवाळी गिफ्ट दिले आहे. यंदाची दिवाळी ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस येणार असल्याने कर्मचाऱ्यांच्या ऑक्टोबरच्या वेतनाबाबत सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. यासंबंधीचा शासन निर्णय राज्य सरकारकडून प्रसिद्ध झाला आहे. राज्य सरकारच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी म्हणजेच २१ ऑक्टोबरपर्यंत वेतन अदा करण्याचे आदेश देणारा शासन निर्णय जारी झाला आहे.
दिवाळी सणाची सुरुवात यावर्षी २२ ऑक्टोबर, २०२२ पासून होत आहे. राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी तसेच निवृत्तीवेतनधारक यांना दिवाळी सण साजरा करताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये या उद्देशाने ऑक्टोबर २०२२ चे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये देय होणारे वेतन / निवृत्तीवेतन दिवाळी सणापूर्वी देण्याचा सरकारचा विचार होता. राज्य सरकारने वेतन अदा करण्यासंदर्भातील नियम शिथील करुन ऑक्टोबर २०२२ या महिन्याचे वेतन आणि निवृत्तीवेतन २१ ऑक्टोबर २०२२ रोजी अदा करण्याचा निर्णय घेतला.
जिल्हा परिषद, मान्यताप्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था, कृषी विद्यापीठे / अकृषी विद्यापीठे व त्यांच्या संलग्न अशासकीय महाविद्यालयांचे अधिकारी / कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारक यांना देखील याचा लाभ होणार आहे. यासंबधीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश देखील संबधित यंत्रणा आणि विभागांना देण्यात आले आहेत.



**कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार**
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या काही दिवसांपूर्वी राज्य सरकारच्या सेवेतील पाच लाख कर्मचाऱ्यांना दिवाळीसाठी १२५०० रुपयांचा बिनव्याजी अग्रीम उचलण्यास मंजुरी दिली होती. २०१८ नंतर हा निर्णय घेण्यात आला होता. १२५०० रुपये दहा हप्त्यांमध्ये परत जमा करण्याची मुभा कर्मचाऱ्यांना देण्यात आली होती. आता त्यानंतर दिवाळीपूर्वीच ऑक्टोबर महिन्याचं वेतन जमा करण्याचा निर्णय घेत राज्य सरकारनं कर्मचाऱ्यांना दिलासा दिला आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# अनंत अमुची ध्येयासक्ती...

आधुनिक केसरी

माझ्या सगळ्या संवेदना सजग असतात. आणि हिमालय पाहण्याचेच म्हणाल तर आय कॅन फील. आय कॅन टच. आय कॅन सेन्स. ती बर्फाच्छादित शिखरे जणू मी मनात साठवली. 'सेब्रीवर आजपर्यंत अनेक मानाच्या पुरस्कारांचा वर्षाव झालाय. आपल्या पुरस्कारांबद्दल ती कृतज्ञता व्यक्त करते. पण त्यांना ती व्यक्तिगत समजत नाही. हे श्रेय माझे एकट्याचं नाही असं नम्रपणे ती सांगते. आपल्या भारतातील लोक तिला विशेष मनमोकळे वाटले. पण संबंधित अधिकारी व्यक्तींनी अधिक मदत करण्यासाठी पुढे आले पाहिजे असे तिला वाटते. या पुढे अफ्रिकेतही आपले सेंटर्स सुरु करण्याचा तिचा मानस आहे.

पालकांसाठी ती म्हणते, ' आपल्या पाल्यांवर प्रेम जरूर करा. पण त्या प्रेमात त्यांना अति संरक्षण देण्यापेक्षा काही करण्याचा त्यांना विश्वास द्या. कोणत्याही परिस्थितीची उकल करण्याचं सामर्थ्य तुमच्यात आहे असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण करा. सेब्री आपल्याला जे सांगते त्यातील शब्द न शब्द खरा आहे कारण तो प्रत्येक शब्द ती जगली आहे. सेब्रीच राष्ट्रीयत्व कोणतं ? ती कोणत्या एका देशाची नाही. ती सगळ्या जगाची आहे. जिच्यावर तुम्ही आम्ही दृष्टिहीन असा शिक्का मारला तिच्या शब्दात दुसऱ्यांना दृष्टी देण्याचं सामर्थ्य आहे. ती सांगते की प्रत्येकानं स्वप्न पाहावं. पण त्या स्वप्नाला जेव्हा सामाजिक परिवर्तनाची जोड मिळते तेव्हा त्या स्वप्नाचं ' व्हिजन ' होतं . अशी स्वप्न पहा की ज्यामुळे माझा देश, माझा समाज पुढे जाईल. प्रकाश कुठे आहे ? शोधाल तिथे आहे. तो आपण शोधत नाही म्हणून आपल्याला अंधार दिसतो. प्रकाश शोधला की अंधाराचं अस्तित्व आपोआप नाहीसं होतं. कुसुमाग्रजांची ' कोलंबसाचे गर्वगीत ' म्हणून एक सुंदर कविता आहे. कोलंबस भारताच्या शोधात निघालेला असतो. मार्गात अनंत अडचणी येतात. पण त्या त्याला आपल्या ध्येयापासून विचलीत करू शकत नाहीत अशा अर्थाची ही कविता आहे. त्या कवितेच्या ओळींनी या लेखाचा शेवट करू या.

मार्ग आमुचा रोधू न शकती
ना धन ना दारा घराची वा वीतभर कारा
मानवतेचे निशाण मिरवू महासागरात,
जिंकुनी खंड खंड सारा
चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती,
कथा या खुळ्या सागराला
"अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन्
आशा किनारा तुला पामराला!"



# आनंदी पहाट

## ऐतिहासिक कलांचे वारसदार व्हावे

आधुनिक केसरी

आपल्या संकृतीचे दर्शन आपल्या कलाकृतीतून प्रत्येकाच्या प्रकृतीनुसार होणे योग्य ठरत असून देखील, त्याची जाणीवच न होणाऱ्या कलेचे सादरीकरण करणाऱ्यांना उणिव संपन्नच म्हणावे लागेल. आपल्या देशाला कलाक्षेत्रात खूप मोठा वारसा लाभलेला असून देखील त्याची जपणूक करणे जरुरीचे का आहे? हेच सर्वप्रथम शालेय जीवनापासून शिकवले पाहिजे, बालवयातच प्रत्येकाच्या अंतर्मनावर कोरले गेले पाहिजे.

आपल्या प्रत्येकाला नेहमीच काहीतरी वेगळे करायची इर्षा असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अर्थात ती असायला देखील काहीच हरकत नाही; परंतू आपण आपल्या देशाच्या ऐतिहासिक कलांचे वारसदार आहोत ह्याचा स्वाभिमान देखील बाळगला पाहिजे. निदान आपण कलांचे वारसदार असल्याची जाणीव तरी व्हायला पाहिजे. नव्याने जन्माला आलेली प्रत्येक पिढी ही अनुकरणप्रिय असते. कलाकृतीचे शास्त्र आणि त्याचा वारसा जर आपणच पुढे चालू ठेवला तरच पुढील पिढी देखील अनुकरणीय कृतीतून आपल्या कलेच्या संकृतीचे जतन करेल.

आधी केले आणि मगच सांगितले, असेच विचार, वर्तन आणि व्यवहार आपण अंगीकारत असल्यावर आपल्या पुढील अनेक पिढ्या प्रत्येक कलाकृतींच्या शास्त्राचा विचार, अभ्यास आणि त्यांचे जतन केल्याशिवाय राहणार नाही. साकारण्यात येणारी प्रत्येक कलाकृती ही विकृतीचे नाही तर आपल्या संकृतीचे दर्शन घडवून कलाकृतीच्या शास्त्राची जपणूक करत राहील. भारतीय संस्कृतीतील प्रत्येक कलांचा संबंध आपल्या मानसिक स्वास्थ्याशी असल्याचे समजून घेतले पाहिजे. आपले मानसिक स्वास्थ्य मिळवणे आणि ते टिकवणे हे प्रत्येक शास्त्रीयदृष्ट्या आत्मसात केलेल्या प्रत्येक कलांच्या माध्यमातून शक्य होत असते. एकप्रकारे आंतरिक उर्जा त्याद्वारे आपल्याला प्राप्त होत असल्याची जाणीव आपण करून घेतली पाहिजे.



# प्रेमाचा गुढार्थ | प्रेम जाणे ||

प्रेमाचे हे गीत | प्रेम भावे गावे ||
प्रेमाने जिंकावे | सकळांसी ||१||

द्वेष निंदा भाव | गतीचे रोधक ||
आयुष्या जाचक | क्लेशदायी ||२||

आशेच्या मुळाशी | दुःखाचेचं जाळे ||
आपुलेच गळे | कापताती ||३||

मृगजळा संगे | रमतो का मना ||
सुटेल का पान्हा | वांझोटीस ||४||

सावध होऊनी | साधावा भावार्थ ||
प्रेमाचा गुढार्थ | प्रेम जाणे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी


## रेणुकाकृपा-महात्म्य

करा अंबेची साधना। निशिदिन आराधना।
रेणुकेची होता कृपा। भय मोहाच्या अंजना।।
मोहक्रोधदंभकामा। टाकी जाळून सर्वथा।
पुढे येती मोक्षधामा। जाती दूर सर्व व्यथा।।
सरते प्राक्तन सारे। नुरते रे कर्म काही।
सांगे चंद्रहास खरे। ताप भवांचे सरती।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# ।। दासबोध स्तवन ।।



## अनिर्वाच्य निरुपण

आधुनिक केसरी

नमस्कार मित्रांनो, आपण आता 40व्या ओवीपर्यन्त आलो आहोत. संपूर्ण समास तत्वज्ञानावर आहे. शुध्द व सरळ तर्काने या अद्वेतमय सहजस्थितीची चर्चा व चिकित्सा केली तर आपण सध्या भ्रमात वावरतो एवढी आपल्या बुध्दीची जाणीव होते. "मी अज्ञानी आहे"ही खात्री करून देणे हेच परमार्थाच्या क्षेत्रात माणसाच्या बुध्दीचे मोठे कौतुक आहे. मन अर्थरूप केले की आत्मज्ञानाने मिळणाऱ्या समाधानावर परमोच्च पातळीवर साधक पोहचतो. त्याच्या चित्तवृत्तीत स्वानंद असतो. अद्वैताच्या विवेचनामध्ये जेवढे ज्ञान सांगितले ते शब्दरूप असल्याने मायेच्या क्षेत्रात येते. देहबुध्दीला ते खरे वाटले तरी स्वरूपानुभावाच्या बाजुने स्वप्नातील ज्ञाना प्रमाणेचं आहे. एकदा का आत्मसाक्षात्कार झाला की ते आपोआप नाहीसे होते. मग शब्दांच्या पलीकडे असणारे स्वानंद सुख तेवढे शिल्लक रहाते।




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

42 वी ओवी तर आपल्याला खुप मोठे ज्ञान सांगुन जाते. समर्थ म्हणतात."आत्मज्ञानामध्ये संपूर्ण एकरूपता असते अनुभव व अनुभव घेणारा हे तिथे नसतात . तेथे शब्दज्ञानाला वाव नसतो. ज्ञानाच्या या अवस्थेत साधक अत्यंत शांत व स्वस्थ असतो.

# परनिंदा व विद्येचा अभिमान माणसाला भगवंतापासून दूर नेतात

आधुनिक केसरी



परनिंदा करण्यासारखे पाप नाही. निंदेची सवय फार वाईट असते; तिच्यामुळे आपले स्वतःचेच नुकसान होते. दुसऱ्याला दुःख व्हावे म्हणून माणूस परनिंदा करतो, पण ती ऐकायला तो हजरच कुठे असतो ? म्हणजे मग आपण यात काय साधले ? निंदेमुळे आपलेच मन दूषित होते. दूषित मन किंवा दुष्कर्म हे माणसाला परनिंदेला प्रवृत्त करते. ज्याला परनिंदा गोड वाटते, त्याने समजावे की आपल्याला भगवंत अजून फार दूर राहिला आहे. तिखट तिखटाप्रमाणे लागू लागणे ही जशी सापाचे विष उतरल्याची खूण आहे, त्याचप्रमाणे परनिंदा गोड वाटेनाशी झाली की देव जवळ येत चालला असे समजावे. म्हणून, ज्याला स्वतःचे हित करून घ्यायचे असेल त्याने परनिंदा सोडून द्यावी आणि जिव्हा नामाला वाहावी. भगवंताच्या मार्गाने जाणाऱ्याने, दुसऱ्याच्या ठिकाणी दिसणाऱ्या दोषांचे बीज आपल्यामध्ये आहे हे ध्यानात ठेवून वागावे, आणि अवगुणाचे तण आपल्या अंतःकरणातून काढून टाकून तिथे भगवंताच्या नामाचे बीज पेरावे. पुष्कळ वेळा आपले दोष आपल्याला कळतात, ते भगवंताचा आड येतात हे देखील कळते, पण त्याला आपला इलाज नसतो. उदाहरणार्थ, काही लोकांची दृष्टी फारच बाधक असते. एखादी चांगली वस्तू किंवा गोष्ट त्यांनी बघितली की ती बिघडते. असे दोष पुष्कळ वेळा ज्याचे त्याला सुधारता येत नाहीत. पण सत्संगती जर लाभली तर मात्र असले दोषदेखील सुधारतात. हाच संतांच्या संगतीचा महिमा आहे. मनुष्य स्वभावतः आपले दोष वाढविण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे त्याचे जीवन सुखमय होत नाही. तो दुसऱ्याला त्याचा दोष दाखवून देईल, पण त्याला स्वतःला आपला दोष कळणार नाही. विद्या ही बरेच वेळा मनुष्याला भगवंतापासून दूर नेते. वारकरी पंथातले अडाणी लोक 'विठ्ठल विठ्ठल' म्हणता म्हणता भगवंताला ओळखतात, पण शहाणे लोक परमार्थाची पुस्तके वाचूनही त्याला ओळखीत नाहीत. घरात बदाम आणि खारका यांची पोती भरून ठेवली, तरी ते पदार्थ जोपर्यंत हाडामांसात जाऊन रक्तांत मिसळत नाहीत तोपर्यंत त्यांचा उपयोग नाही. त्याचप्रमाणे, पुस्तकी ज्ञानाचे पर्यवसान आचरणात झाले नाही तर ते व्यर्थ जाते. भगवंताकरिता कुणीही कष्ट करून नका; कष्टाने साध्य होणारी ती वस्तू नव्हे. ती वस्तू सात्त्विक प्रेमाने साध्य होणारी आहे; आणि प्रेमामध्ये झालेले कष्ट मनुष्य चटकन विसरून जातो. तुम्ही भगवंताच्या प्रेमाने अगदी भरून जा, आपपसांत प्रेम वाढवा, म्हणजे मग सर्व जग आनंदमय, प्रेममय दिसू लागेल, आणि शेवटी तुम्हाला स्वतःचा विसर पडेल.

**-श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर**

# अनन्यतेतच भक्ती जन्म पावते

आधुनिक केसरी

भगवंतावाचून भक्ति होत नाही. ज्याप्रमाणे सौभाग्यवती म्हटली की तिला नवरा असायचाच, त्याप्रमाणे भक्ति म्हटली की तिथे भगवंत असलाच पाहिजे. भगवंत हा भक्तीचा प्राण आहे. भक्ति आणि माया दोघी भगवंताच्याच स्त्रिया आहेत. पण, म्हणून त्या सवती आहेत. दोन सवती एके ठिकाणी सुखाने नांदत नाहीत हा जगाचा अनुभव आहे. मायेला बाजूला करायची झाल्यास आपण भक्तीची कास धरावी. म्हणजे ती मायेस आपोआप हुसकावून लावते. मायेचे वर्चस्व नाहीसे झाले की आपले काम होऊन जाते. तालमीत जाणारा आणि तालमीत न जाणारा यांच्यामध्ये थोडातरी फरक दिसायला पाहिजे; तालमीत जाणार्याच्या शरीरावर थोडातरी पीळ दिसायला हवा ना ! तसेच, जो भक्ति करतो त्याच्या वृत्तीमध्ये थोडा तरी फरक पडला पाहिजे. आपल्याला जर विद्या पाहिजे असेल तर आपण विद्वानांची संगत धरली पाहिजे, त्याचप्रमाणे आपल्याला भक्ति आणि आनंद पाहिजे असेल तर भगवंताची संगत धरली पाहिजे. सर्व सृष्टी रामरूप दिसणे हेच भक्तीचे फळ आहे. याकरिता अनन्यतेची अत्यंत जरूरी आहे. अनन्यतेतच भक्ति जन्म पावते. द्रौपदीची अनन्यता खरी. भगवंताशिवाय मला दुसरा कोणताच आधार नाही याची खात्री पटणे, हेच अनन्यतेचे स्वरूप. माझी प्राप्ती करून घ्यायची असेल तर भक्ति हेच साधन आहे असे स्वतः परमात्म्यानेच सांगितले आहे. जसे नामस्मरण विस्मरणाने करता येत नाही, त्याचप्रमाणे भक्ति अभिमानाने करता येत नाही. समजा, एखाद्या माणसाचे लग्न झाले. तो काल ब्रह्मचारी होता आणि आज गृहस्थाश्रमी झाला; तरी त्याच्या जीवनांतले इतर व्यवसाय चालूच राहतात. त्याचप्रमाणे, आपण भगवंताचे झालो तरी आपले प्रपंचाचे सर्व व्यवहार पूर्ववत् सुरळीत चालतात. जी जी गोष्ट घडेल ती ती आपण भगवंताला सांगावी. भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव ठेवण्यासाठी, भगवंताला सांगून प्रत्येक काम करावे. भक्तीने भगवंत साधतो आणि फलाशा आपोआप कमी होतात. म्हणून आपण उपासना किंवा भक्ति वाढवावी.

'मी देही आहे,' असे म्हणता म्हणता आपण या देहाचे झालो; तसेच मी देवाचा आहे असे म्हणत गेल्याने आपण देवरूप होऊन जाऊ. पण हे होण्यासाठी सगुणोपासनेची जरूरी आहे. रस्ता चालून गेल्याशिवाय जसे आपले घर गाठता येत नाही, त्याप्रमाणे सगुणोपासनेशिवाय आपल्याला उपाधिरहित होता येत नाही. राम कर्ता आहे ही भावना म्हणजेच सगुणोपासना, आणि हेच खऱ्या भक्तीचे स्वरूप आहे. 'तू जे देशील ते मला आवडेल' असे आपण भगवंताला सांगावे, आणि 'माझ्या देवाला हे आवडेल का?' अशा भावनेने जगात वागावे. घडणारी प्रत्येक गोष्ट भगवंताच्या इच्छेने घडते अशी भावना कायम ठेवणे म्हणजेच भक्ति करणे होय.

# करोडी ते लासूर स्टेशन रस्ता बनला मृत्यूचा सापळा

## खड्ड्यांमुळे अनेक निष्पाप जिवांचा बळी; अनेकांना हाडांच्या व मणक्याच्या आजाराने हॉस्पिटलच्या तर वाहनांना गॅरेजच्या वाऱ्या





आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**
**गंगापूर :** तालुक्यातील करोडी ते लासूर स्टेशन येथून जाणाऱ्या नागपूर-मुबंई राष्ट्रीय महामार्गावर मोठ-मोठे जीवघेणे खड्डे पडल्याने वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. खड्डयांमुळे अनेक छोटे-मोठे अपघात होतात. यामुळे हा महामार्ग मृत्यूचा सापळा बनल्याने यमराज महामार्ग बनला आहे. महामार्गावर डांबरीकरण करण्याची मागणी होत आहे मात्र लोकप्रतीनिधी व संबंधित विभागाने ने दुर्लक्ष केले आहे. नागपूर मुबंई महामार्ग इतर महामार्गापेक्षा कमी अंतराचा असल्यामुळे शिर्डीला साई बाबाच्या दर्शनासाठी याच महामार्गाने भाविक जा-ये करतात तसेच औरंगाबादसह वाळुज, पंढरपूर, चिकलठाणा आदी ठिकाणी असलेल्या कंपनीची जड वाहने याच महामार्गाने ये-जा करतात. तसेच मुबंई, नाशिक, शिर्डी कडील पर्यटक औरंगाबाद, दौलताबाद, खुलताबाद देवस्थान, पर्यटन स्थळ पाहण्यासाठी याच महामार्गाने जातात. यामुळे नागपूर मुबंई महामार्गावर दिवस रात्र मोठी गर्दी असते. मात्र लासूर स्टेशन ते वैजापूरपर्यत मोठ मोठे खड्डे आहेत. यामुळे काहींनी मुले गमावली, काहींनी आई वडील गमावले तर अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व आलेले आहे. संबंधित विभागाने गंभीर दखल घेत नागपूर मुबंई महामार्ग लासूर स्टेशन ते वैजापूर डांबरीकरण करावी अशी मागणी जोर धरत आहे.

आर .टी . ओ कार्यलयात दररोज येणे जाणे असल्याने मला याच रस्त्याने अपडाऊन करावे लागते मात्र करोडी ते लासूर स्टेशन पर्यंत या रस्त्यात खड्डेच खड्डे झाल्याने हा रस्ता जीवघेणा झाला असल्याने लोकप्रतिनिधिनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे कारण या रस्त्याने शिर्डीला जाण्यासाठी अनेक भाविक परजिल्ह्यातून येत असतात मात्र करोडी पर्यंत धुळे सोलापूर रास्ता चांगला असल्याने सुसाट वाहने करोडीपर्यंत येतात त्यापुढे रस्त्यावर खड्डे असल्याने त्याच वेगाने पुढे धावतात मात्र या खड्ड्यात वाहने जाऊन अपघातग्रस्त होतात त्यात अनेक निष्पाप जिवंचा बळी अद्यापर्यंत गेले असून अनेकांना अपंगत्व आलेले आहे त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती त्वरित करण्यात यावी . **उमेश कुमावत ( प्रवाशी लासूर स्टेशन )**

# राडी येथे कॅम्प घेऊन रेशनकार्ड उपलब्ध करून द्यावेत : गणेश गंगणे यांची मागणी

## अखिल भारतीय किसान काँग्रेसचे तहसीलदार यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** तालुक्यातील राडी येथे कॅम्प घेऊन रेशनकार्ड उपलब्ध करून द्यावेत. कारण, सुमारे 30 ते 35 वर्षांपूर्वी राडी गावात अनेकांना दिलेले रेशनकार्ड हे हरवले तसेच जीर्ण झालेले आहेत. तरी तात्काळ रेशनकार्ड देण्याची मागणी किसान काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश गंगणे, ओबीसी तालुकाध्यक्ष धनराज कोळगीरे यांच्यासह राडी येथील ग्रामस्थांकडून तहसिलदार डॉ.विपीन पाटील यांना सोमवार, दिनांक 17 ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. तालुक्यातील राडी गावातील अनेक नागरिकांनी किसान काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश गंगणे यांच्याकडे रेशनकार्ड देण्याची मागणी केली होती.



त्याची दखल घेत गंगणे यांनी गावकऱ्यांसह सोमवारी अंबाजोगाई येथे तहसिलदार डॉ. विपीन पाटील तसेच पुरवठा विभागाचे अव्वल कारकून शेख यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देऊन सर्व कार्डधारकांना नव्याने रेशनकार्ड देण्याची मागणी करण्यात आली. राडी गावात मागील सुमारे 30 ते 35 वर्षांपासून ज्या कार्डधारकांचे रेशनच्या यादीत अंत्योदय, बीपीएल व एपीएल योजनेत नांवे समाविष्ट आहेत, त्यापैकी अनेकांचे पिवळे व केशरी कार्ड यापूर्वीच काही कारणास्तव परत घेण्यात आले होते. तसेच अनेकांचे रेशनकार्ड हरवले तर काहींचे रेशनकार्ड हे जीर्ण झालेले आहेत, रेशनकार्ड नसल्याने गावातील अनेक विद्यार्थी, महिला, पुरूष, युवक आणि ज्येष्ठ नागरिक सर्वांनाच अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यात वैद्यकीय कामासाठी, पासपोर्ट सारख्या महत्वाच्या कामांसह अन्य शासकीय कामासाठी रेशनकार्डची कार्डधारकांच्या संपूर्ण कुटुंबाला अवश्यकता भासत असून त्यामुळे नवीन कार्ड देण्याची मागणी किसान काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश गंगणे, ओबीसीचे तालुकाध्यक्ष धनराज कोळगीरे, राडी शाखेचे अध्यक्ष शिवाजी गंगणे, उपाध्यक्ष सत्तार शेख, भास्कर गंगणे, गुलाब शेख, अश्रुबा कसपटे यांनी तहसिलदार तसेच पुरवठा अधिकारी यांना सोमवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.



# वीरशैव लिंगायत धर्माच्या जगद्गुरूंनी घेतली पंतप्रधान मोदी यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सोमवार रोजी सायं.5 वाजता भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जानेवारी महिन्यात श्रीशैल्य पिठामध्ये होणाऱ्या कार्यक्रमाचे निमंत्रण श्री शैल्य जगदगुरू श्री श्री श्री 1008 डॉ. चनसिद्धाराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी व डॉ. शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज यांनी दिले. यांच्या समवेत केंद्रीय संसदीय मंत्री प्रल्हाद जोशी उपस्थित होते. पंतप्रधान मोदी यांनी निमंत्रण स्वीकारून कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी आनंदाने होकार दिला. श्रीशैल्य जगदगुरु श्री श्री श्री 1008 डॉ. चनसिद्धाराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजींनी पंतप्रधान मोदीसोबत वीरशैव लिंगायत समाजातील विविध समस्यांवर व देशातील विविध प्रश्नांवर 20 मिनिट विस्तृत चर्चा केली.

# कामदार आमदारांमुळे धुळ खात पडलेली एमआरआय मशीन महिनाभरात सुरु होणार

आधुनिक केसरी न्यूज

**सुनील सिरसाट**
**अंबाजोगाई :** येथील स्वा.रा.ती.रुग्णालयास महाविकास आघाडी शासनाकडून आधुनिक '३.० टेस्ला एम.आर.आय. मशीन' पुरविण्यात आली होती. मात्र, योग्य त्या विद्युत जोडणी अभावी ती मशीन कार्यान्वित न झाल्याने धुळखात पडलेली होती. तिची बरीच वायरींग उदरांनी कुरतडल्याची माहिती रुग्णालयातील सूत्रांकडून कळते. परंतु केज विधानसभा मतदारसंघाच्या कामदार-दमदार आ.सौ. नमिता अक्षय मुंदडा यांनी पालकमंत्री अतुल सावे यांच्यासमोर हा विषय मांडून पाठपुरावा केला. त्यानंतर या मशीनला सोमवारी (दि.१७) तात्पुरती विद्युत जोडणी देण्यात आली असून साधारणपणे एका महिन्यात एम.आर.आय. मशीन कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय हे आशिया खंडातील सर्वात मोठे ग्रामीण रुग्णालय असुन ते जवळपास तीन जिल्ह्यातील



गोरगरीब रुग्णांसाठी जीवनवाहिनी आहे. क्लिष्ट रोगांवरही या रुग्णालयात अत्यल्प दरात किंवा मोफत उपचार होतात. त्यामुळे दररोज हजारो रुग्ण या ठिकाणी उपचारासाठी येतात. मात्र एम.आर. आय. सारखी सुविधा येथे उपस्थित नसल्याने रुग्णांना वैद्यकीय तपासणीसाठी मोठ्या शहरात

**लवकरच कायमस्वरुपी जोडणी होईल**रुग्णांची गरज लक्षात घेता एमआरआय मशीन त्वरित सुरु करण्यासाठी तात्पुरती विद्युत जोडणी देण्यात आली आहे . मशीनसाठी स्वतंत्र विद्युत यंत्रणा उभारण्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे अशी माहिती आ . मुंदडा यांनी दिली .

जावे लागत होते. त्यामुळे शासनाने तब्बल १७ कोटी ३२ लक्ष ५१ हजार रुपयांची फिलिप्स कंपनीची ३.० टेस्ला एम.आर.आय. मशीन रुग्णालयासाठी मंजूर केली. मशीनसाठीची स्वतंत्र इमारत तयार होऊन त्यात मशीनही बसवण्यात आली. परंतु केवळ आवश्यक त्या क्षमतेची विद्युत जोडणी उपलब्ध नसल्याने वर्षभरापासून ही मशीन धूळखात पडून आहे. त्यामुळे आ.नमिता मुंदडा यांनी पालकमंत्री अतुल सावे यांच्या पहिल्याच बैठकीत हा विषय त्यांच्यासमोर मांडला आणि उपाययोजना देखील सुचवल्या. आ.मुंदडा यांच्या मागणीचे महत्व लक्षात घेत सावे यांनी तात्पुरत्या विद्युत जोडणीस त्वरित मान्यता दिली. तुर्तास मशीन सुरू करुन रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून तात्पुरत्या विद्युत जोडणीचे काम पूर्ण केले असून महिनाभरात मशीन सुरु होणार होईल. तोपर्यंत दरम्यानच्या काळात कायमस्वरुपी विद्युत जोडणी तात्काळ देण्यासाठी आ. मुंदडा यांनी महावितरणकडे पाठपुरावा सुरू राहणार असल्याचे सांगितले. तोपर्यंत तुर्त अधीक्षक अभियंता निकम, कार्यकारी अभियंता वाघमारे, उपअभियंता मिसाळ, सिरशीकर यांनी तत्काळ कार्यवाही करत विद्युत जोडणी दिली असुन काल सोमवारी दुपारी मशीनसाठी विद्युत पुरवठा करून चाचणीही घेण्यात आली. याप्रसंगी ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे, अधीक्षक डॉ. राकेश जाधव, प्रसाद चिक्षे, डॉ. अमित लोमटे, फिलिप्स कंपनीचे जितेश जोशी उपस्थित होते. मशीनच्या विविध चाचण्या आणि इतर प्रक्रिया पार पडल्यावर साधारणपणे एक महिन्यात मशीन कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. परिसरातील हजारो गरजू आणि गरीब रुग्णांना याचा लाभ होणार असून वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना जिल्ह्याबाहेर जावे लागणार नाही.

# पुन्हा एकदा टार्गेट किलिंग

आधुनिक केसरी

**काश्मीरमध्ये टार्गेट किलिंगच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. दहशतवाद्यांनी पुन्हा एकदा दोन मजुरांवर प्राणघातक हल्ला केला आहे. या हल्ल्यात दोन्ही मजुरांचा मृत्यू झाला आहे. हे दोन्ही मजूर उत्तर प्रदेशमधील कन्नोज जिल्ह्यातील असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, या हल्ल्याची जबाबदारी लष्कर ए तोयबाने घेतली आहे. हत्या करण्यात आलेले मजूरांवर शोपियातील हरमनपरिसरात ग्रेनेड हल्ला करण्यात आला होता. ग्रनेड हल्ला करण्यात आल्यानंतर परिसरात एकच खळबळ माजली होती. या हल्ल्यात उत्तर प्रदेशचे दोन्ही मजूर गंभीर जखमी झाले होते. रुग्णालयात नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला आहे. शोपियामध्ये झालेल्या हल्ल्यानंतर पोलिसांना एका दहशतवाद्याला पकडण्यात यश आले आहे. या दहशतवाद्याचे नाव इमरान बशीर गनी असे असून तो एक हायब्रीड दहशतवादी आहे. या प्रकरणी पुढील तपास आणि चौकशी सुरू आहे. हत्या करण्यात आलेल्या मजुरांची नावे मनीष कुमार आणि राम सागर अशी आहेत. शोपियामध्ये झालेल्या हल्ल्यानंतर पोलिसांना एका दहशतवाद्याला पकडण्यात यश आले आहे. या दहशतवाद्याचे नाव इमरान बशीर गनी असे असून तो एक हायब्रीड दहशतवादी आहे. या प्रकरणी पुढील तपास आणि चौकशी सुरू आहे. हत्या करण्यात आलेल्या मजुरांची नावे मनीष कुमार आणि राम सागर अशी आहेत. ५ ऑक्टोबरला दहशतवाद्यांनी काश्मिरी पंडितांवरदेखील हल्ला केली आहे. शोपियातील दहशतवाद्यांनी काश्मिरी पंडित पूरण कृष्ण भट्ट यांच्यावर गोळीबार करत हत्या केली आहे. त्यानंतर दहशतवादी फरार झाले. जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांच्यासह अनेक राजकीय पक्षांनी या घटनेचा निषेध केला आहे. तर, पोलिसांनी दिलेले माहितीनुसार, पुरण कृष्ण भट्ट यांच्या हत्येची जबाबदारी काश्मीर फ्रीडम फायटर या दहशतवादी संघटनेने घेतली. काश्मीरमध्ये घडणाऱ्या या घटनांमुळे काश्मिरी पंडितांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी आहे.**



# रानातली कविता मनात पेरणारा कास्तकार लोककवी : प्रा. इंद्रजित भालेराव

आधुनिक केसरी



श्रावण भवर
संपर्क क्र. 9421932704


**मराठवाड्याचा मृदगंध अखिल महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, सह्याद्रीच्या कडा कपारात मनमुराद, मुक्तहस्ताने उधळून सारा आसमंत मनमोहक सुगंधाने उजळून सोडणारे मराठवाड्याच्या मातीतील महान कवी, साहित्यातील बाप माणूस. प्रा. गुरुवर्य इंद्रजित भालेराव सर. ज्याची बाप कविता आजची या मातीतील माणसांच्या डोळ्याच्या कडा पाणावन्यास समर्थ आहे. बाप कविता या कळ्यामायीच्या माय बापाचं रुदनं शब्दबध्द करून आम्हाला आमच्या माय बापाच्या काबाडकष्ठाची जाणीव करून देतात. आम्हाला भानावर आणते. बाप झाल्या शिवाय बाप कळतं नाही हे जरी खर असल तरी, बाप काय असतो याची प्रचिती कवितेतून आम्हाला शब्दाशब्दातून जाणवते.**

शेती, शेतकरी, निसर्ग आणि कवी यांचं जन्म जन्मांतरीचं अतुट नातं आहे. जिथं रवी पोहचत नाही तिथं कवी पोहोचतो म्हणतात आणि हे अगदी शत प्रतिशत सत्य आहे. रवीची कक्षा अपुरी पडत असेल त्यामुळेच कदाचित कवीच्या कक्षा अमर्याद वाढल्या असाव्यात. शब्द हे नवं सृजनाचं, सर्जनाचं आणि संगोपन, संवर्धनाचं अलौकिक कार्य करतात. त्यामुळेच शब्दाचा जागर करणारे, जोगवा मागणारे रवी पुत्र कवी सर्वश्रेष्ठ ठरतं असावेत. श्रावण दरवर्षी येतोच, पण प्रत्येक श्रावण बरसेल आणि बहरेल असं नाही. बहरण्याची अन् बरसण्याची आस धरून बसलेल्या निसर्गाला जेव्हा श्रावणाच्या थेंबाचा परीस स्पर्श होतो तेव्हा, तेव्हा निसर्गाचं बहरण शब्दबध्द करणं शब्दातीत आहे.

ज्या महान,मोठ्या देव माणसांना, थोर व्यक्तिमत्त्वाला आपण पुस्तकाच्या पानात पाहून मनात मेंदुत अन् मस्तकात धारण केलं, ज्याच्या लेखणीचे शब्द डोक्यावर घेऊन नाचलो, गायलो ते पुस्तकातल्या थोर माणसांची प्रत्यक्ष भेट होते, डोळ्यासमोर उभे ठाकतात आणि आपण पुस्तकातून झालेला परीस स्पर्श प्रत्यक्षात अनुभवतो तेंव्हा, क्षणाच्या अनुभूतीच्या आनंदाची परिसीमा अलैकिक असतें. शब्दातीत आहे. त्या आनंदाचं वर्णन करण्यासाठी लेखणीही खुजी ठरते. ज्यांच्या कविता कथा, पुस्तक वाचत आयुष्याची आर्धी वाटचाल केली. त्यांच्या कविता वाचत, गात, ऐकत आपण मोठे झालो त्या शब्द प्रभूला, कवीला डोळेभरून पाहण्याचा आणि डोळ्यात भरून घेण्याचा आनंद अलौकिक आहे.

मराठवाड्याचा मृदगंध अखिल महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, सह्याद्रीच्या कडा कपारात मनमुराद, मुक्तहस्ताने उधळून सारा आसमंत मनमोहक सुगंधाने उजळून सोडणारे मराठवाड्याच्या मातीतील महान कवी, साहित्यातील बाप माणूस. प्रा. गुरुवर्य इंद्रजित भालेराव सर. ज्याची बाप कविता आजची या मातीतील माणसांच्या डोळ्याच्या कडा पाणावन्यास समर्थ आहे. बाप कविता या कळ्यामायीच्या माय बापाचं रुदनं शब्दबध्द करून आम्हाला आमच्या माय बापाच्या काबाडकष्ठाची जाणीव करून देतात. आम्हाला भानावर आणते. बाप झाल्या शिवाय बाप कळतं नाही हे जरी खर असल तरी, बाप काय असतो याची प्रचिती कवितेतून आम्हाला शब्दाशब्दातून जाणवते.

काठ्या कुट्याचा तुडवीत रस्ता, माझ्या गावाकड चल माझ्या दोस्ता. आदी कविता वाचत, गात ऐकत आमचं महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झालं. आशी एकही गॅदरिंग नव्हती की ज्यात ही कविता नव्हती. या कवितेशिवय गॅदरिंग पूर्णच होत नव्हती.



संवेदनांनं, सृजनानं, सर्जनानं, ओतप्रेत भरलेला आणि कायम वाचन, लिखाण आणि कर्म की प्रधनाता सर्वोपरी या तत्वावर चालणारा मोठया मनाचा, महान कवी, थोर साहित्यिक मा. प्रा. इंद्रजित भालेराव सर.

मोठी माणसं त्यां चा मोठेपणा त्यांच्या उदात्त कृतीतून, मातृत्वातून, ममतेतून दाखवतात. आदरणीय गुरुवर्य मा. प्रा. इंद्रजित भालेरव सरांची पहिली प्रत्यक्ष भेट झाली ती जिल्हा परीषद प्रा. शाळा पारडी चे शिक्षक श्री. युवराज माने सरांच्या गुरूजी,तु मला आवडला! या पुस्तकाचा प्रकाशन सोहळ्यात. याची देही याची डोळा आपल्या आदर्श व्यक्तिमत्वाला आपण भेटलो याचा आनंद मला गगनात मावत नव्हता. प्रत्यक्ष भेटीचा दैव दुर्लभ योग मोठया भाग्यानं जुळून आला होता.

पहिल्याच भेटीत असं वाटलं की या थोर माणसांसोबत आपला ऋणानुबंध हा आजचा नाही, सनातन आहे. फार फार पुरातन आहे. नाळ जोडलेली होतीच प्रत्यक्ष भेटून नात जोडायच होत. पहिल्याच भेटीत प्रा. इंद्रजित भालेराव सरांनी आमची सर्वाची फार आस्थेवाईकपणे चौकशी केली. जसं काही आमचं आणि त्यांचं फार पूर्वी पासून नात आहे. ओळख आहे. भालेराव सरांनी आमची सर्वांची आपुलकीनं, आस्थेनं, आत्मियतेनं, आपलेपणानं वागणं मला फार भावल. हा सारा माझ्यासाठी नवखा अनुभव होता.

साहित्यिकांच्या मांदियाळीत मी अजूनही बालवाडीतही नसलेला मी विद्यार्थी. त्यांना मीही कधीकधी लिहितो, कविता करतो असं म्हणालो त्यांनी हे ऐकल्यावर माझ्याशी अजुन आस्थेवाईकपणे साधलेला संवाद हा माझ्यासाठी सदैव शाश्वतपणे मनात घर करुन राहिला. श्री. इंद्रजित भालेराव सरांची जेव्हढी ख्याती त्याहूनही थोर त्यांची मतृह्हदायी वृत्ती आहे.

श्री. युवराज माने सरांच्या गुरूजी, तू मला आवडला..! पुस्तकाचे विमोचन केल्यानंतर श्री. इंद्रजित भालेराव सरांनी त्यांच्या फेसबुक पेज वर मानेसारांच्या गुरुजी, तू मला आवडला..! पुस्तकावर प्रकाश टाकणारा लेख लिहिला , माहिती लिहिली. श्री. युवराज माने सर करतं असलेल्या अलौकिक कार्याचा यथोचित सन्मान केला. गौरव केला. त्यांच्या कार्याची, लिखाणाची दखल घेतली अस अनोखं काम करणाऱ्या गुरुजींचं महान कार्य पाहून गुरुजी, तू मला आवडला....! म्हणत शाबासकीची पाठीवर थाप दिली.

सदरील लिखाणात माझ्याही नावाचा उल्लेख कवी म्हणून केलेली पोस्ट मला माने सरांनी व्हॉटसअप केली अन् मला आकाश ठेंगणं झाल्यासारखं झाल. मी फार भारावून गेलो. ज्या प्रमाणे नवीन नवरीच लग्न झालं आणि ती तिच्या नाकातली नथ मोठ्या तोऱ्यात अन् दिमाखात घरा दारात अन् परिसरात साऱ्यांना आपली नथ दाखवत मिरवते तशी अवस्था माझी झाली.

मा. प्रा. प्रख्यात कवी साहित्यिक इंद्रजित भालेराव सरांनी मला कवी म्हणून लावलेलं बिरूद मी आज अभिमानानं मिरवत आहे. वाचत, बोलतं करणारे खुप असतात पण मनातली भाव शब्दबद्ध करण्यासाठी लिहितं करणारे विरळच. मनातलं पेनात, अन् पेनातल पानात उमटविण्याची कला शिकवण्यास प्रेरणा देणारे हात अलौकिक आहे. मला या मातीतल्या महान माणसानं , महान साहित्यिकांनं , या काळ्याआईच्या थोर थोर सुपुत्रानं लिहितं राहण्याची प्रेरणा दिली. कृपा आशीर्वाद दिले.

कवी हे बिरूद लावलं या बिरुदाला शिरोधार्य ठेऊन या साहित्याच्या महान समुद्रात मी माझी छोटीशी नाव कायम वल्हावत ठेवण्याचा मनापासुन प्रयत्न करील. आणि आदरणीय मा. प्रा. इंद्रजित भालेराव सरां चे शब्द हेच आशीर्वाद प्रमाण मानून साहित्य क्षेत्रात मांताक्या मारण्याचा आणि श्रावण सर् बरसवण्याचा कायम प्रयत्न करील..

शिक्षण विभाग पंचायत समिती सेलू, शब्दसह्याद्री आणि अक्षर प्रतिष्ठान सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिनानिमित्त आणि आदरणीय प्रख्यात कवी गुरुवर्य इंद्रजित भालेराव सर यांच्या षष्ठ्यब्दीपूर्ती निमित्त सत्कार समारंभ दिनांक 19 ऑक्टोबरला नितीन विद्यालय आहेर बोरगाव येथे आयोजित केला आहे. यानिमित्त मा. प्रा. डॉ. विनायक राव कोठेकर आणि मा. अमर हबीब यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.. आदरणीय गुरुवर्य प्रा. इंद्रजित भालेराव सर यांना माती महान सुपुत्राला निरोगी, दिर्घ आयुष्य लाभो, सौख्य, संपदा आणि मांगल्य लाभो हिच ईश्वर चरणी सविनय प्रार्थना.

# पोटनिवडणूक : अलाहाबाद, चिकमंगळूर आणि अंधेरी



श्रीनिवास भोंग
संपर्क क्र. 9423783235

आधुनिक केसरी

**.अलाहाबादची पोटनिवडणूक जनमोर्चा या नावाखाली विश्वनाथप्रताप सिंग यांनी लढविली. आणि मोठ्या मताने जिंकली. या पोटनिवडणुकीने देशातील वातावरण बदलले. पुढच्या वर्षी लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेसचा पराभव झाला. चारशे जागांवरून कॉंग्रेस दोनशे जागांवर आली. भाजप दोन जगावरून नव्वद जागांवर गेली. ही अलाहाबादच्या पोटनिवडणुकीची कमाल. अशीच कमाल १९७९ साली कर्नाटकमधील चिकमंगळूर पोटनिवडणुकीत झाली.**

पोटनिवडणुका हा सहसा उत्सुकतेचा विषय नसतो. त्यातील निकालाने एखादे सरकार पडत नाही किंवा नवीन सरकार येत नाही. पण एखादी पोटनिवडणूक प्रचलित निवडणुकीला वळण लावते. १९८८ साली उत्तर प्रदेशमधील अलाहाबाद लोकसभा मतदारसंघातील निकालाने अशीच कमाल केली. अभिनेता अमिताभ बच्चन या मतदारसंघातील खासदार होते. त्यांनी राजीनामा दिला. बोफोर्समुळे. आता लोक बोफोर्स विसरले. बोफोर्स कंपनीच्या तोफा होत्या. या तोफा भारताने स्वीडनकडून घेतल्या होत्या. त्यात दलाली दिल्या घेतल्या गेल्याचा आरोप केला गेला. स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांचे नावही त्यात गोवले गेले होते. प्रत्यक्षात राजीव गांधी या आरोपातून निर्दोष सुटले. नव्व्याणवच्या कारगिल लढाईत या तोफा त्या उपयोगी पडल्या.

अमिताभ बच्चन राजीव गांधी यांचे बालमित्र. राजीव गांधी यांचे आग्रहाखातर त्यांनी १९८४ साली अलाहाबाद लोकसभा निवडणूक लढविली. पुढे राजकारण हा आपला पिंड नाही हे लक्षात घेऊन त्यांनी राजीनामा दिला. त्या मतदारसंघात पोटनिवडणूक लागली. त्याचवेळी राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळातील अर्थमंत्री विश्वनाथप्रताप सिंग यांनी भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर राजीनामा दिला होता. त्यांच्याबरोबर सध्याचे केरळचे राज्यपाल



आरिफ मोहम्मद खान यांनीही मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. त्याला शहाबानो खटल्याचा आधार होता.

अलाहाबादची पोटनिवडणूक जनमोर्चा या नावाखाली विश्वनाथप्रताप सिंग यांनी लढविली. आणि मोठ्या मताने जिंकली. या पोटनिवडणुकीने देशातील वातावरण बदलले. पुढच्या वर्षी लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेसचा पराभव झाला. चारशे जागांवरून कॉंग्रेस दोनशे जागांवर आली. भाजप दोन जगावरून नव्वद जागांवर गेली. ही अलाहाबादच्या पोटनिवडणुकीची कमाल. अशीच कमाल १९७९ साली कर्नाटकमधील चिकमंगळूर पोटनिवडणुकीत झाली. १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत इंदिरा गांधी रायबरेलीमधून पराभून झाल्या होत्या. मात्र संधी मिळताच त्या पुन्हा सक्रीय झाल्या. पोटनिवडणुकीत निवडून आल्या. पुढचा इतिहास सगळ्यांना ज्ञात आहे. अंधेरी पोटनिवडणुकीत शिवसेनेतर्फे ऋतुजा लटके यांना उमेदवारी दिली आहे. सर्वसाधारणपणे दिवंगत व्यक्तीच्या घरातील उमेदवार असल्यास सहानभूतीचा फायदा असतो. महिला उमेदवार हाही एक घटक आहे. भाजपने आपली उमेदवारी मागे घेतली आहे. यामुळे लटके यांचा विजय जवळपास निश्चित दिसत आहे.

**(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक व राजकीय –सामाजिक घडामोडीचे विश्लेषक आहेत)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अबब... तुम्ही किती भयंकर पदार्थ पोटात ढकलता ?



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

आधुनिक केसरी

प्राण्यांना पकडून त्यांना कत्तलखान्यात ढकलणे व असहाय प्राण्यांना छळ करून मारणे आणि त्यांचे मांस विविध मसाले घालून खाणं हा सारा मानवतेवरचा कलंक आहे. ज्या पौष्टीक आहारासाठी मांसाहार केला जातो तो मांसाहार तरी योग्य उपकारक आहे का ? याचे उत्तर पूर्णपणे नकारार्थी आहे. कोलेस्टेरॉल हा रक्तातील स्निग्ध आम्लबरोबर संयुक्तपणे असणारा महत्त्वाचा घटक. थोड्याफार प्रमाणात कोलेस्टेरॉल शरीराला आवश्यक आहे मात्र त्याचा प्रमाण वाढलं तर ते अत्यंत घातक ठरतं मांस, अंडी व इतर प्राणीजन्य पदार्थ यामध्ये कोलेस्टेरॉलचं प्रमाण भरपूर असतं हे पदार्थ खाल्ल्यामुळे रासायनिक किंवा चेताग्रहाच्या (रिसेप्टर)संख्येत घट होते. यामुळे रक्तप्रवाहात कोलेस्टेरॉलचं प्रमाण वाढतं यामुळे हृदयविकार, मूत्रपिंडाचे विकार, खडे होतात. हृदयविकृती व उच्च रक्तदाब हे विकार रक्तवाहिन्यांच्या आत कोलेस्टेरॉल साठुन होतात.

एवढ्या मोठ्या प्रमाणात प्राणी कशासाठी मारले जातात याची उत्तरं दोन आहेत एक तर खाण्यासाठी पशूंचा वापर होतो आणि दुसरे सौंदर्यप्रसाधने, औषधे तयार करण्यासाठी. आपल्याला ऐकून खरोखरच आश्चर्य वाटेल पण आज बाजारात असलेली अनेक सौंदर्य प्रसाधने तयार करण्यासाठी किंवा त्यांची परीक्षा चाचणी घेण्यासाठी प्राण्यांचा छळ आणि हत्या करतात. अशा वस्तूंमध्ये अंडी किंवा तत्सम पदार्थ वापरलेले असतात. अशा पद्धतीने प्राण्यांची हत्या करून त्यांच्या अवयवांचा वापर करून तयार केलेली प्रसाधने लोक खुलेआम वापरतात.

साबणाच्या सुवासिकतेमागे, जाहिरात करण्यामागे प्राण्यांची हत्या लपलेली आहे हे उत्पादक आपल्या लक्षात सुद्धा येऊ देत नाही. फर किंवा मृदु लोमाची टोपी अनेक लोक वापरतात पण किती जणांना माहित असतं की, ही फर आईच्या गर्भातून बळजबरीने बाहेर काढलेल्या कोकराच्या कातड्याची आहे. काही प्रसिद्ध कंपन्यांची बूट किंवा चपलाही अशाच पिल्लांच्या कातड्यापासून बनवलेल्या असतात. याशिवाय माणसांच्या खाण्यात दरवर्षी अगणित प्राणी सर्रास मारले जातात. दरवर्षी अधिकृत कत्तलखान्यात सुमारे २० लाख जनावर मारले जातात असं माजी शेती मंत्री सरदार बुटासिंग यांनी संसदेत सांगितलं होतं. हा भरमसाठ आकडा केवळ अधिकृत कत्तल खाण्यातला आहे. याशिवाय खेडोपाडी पसरलेले हजारो अनधिकृत कत्तलखाने, देवापुढे दिले जाणारे बळी, घराघरात, हॉटेलातून मारले जाणारे प्राणी वेगळेच. स्वातंत्र्यापूर्वी आपल्या देशात जेमतेम तीनशे कत्तलखाने होते आता त्यांची अधिकृत संख्या लाखात आहे. अनेकदा गाड्यांमध्ये भरून प्राणी नेले जातात, या गाड्यांमध्ये प्राणी इतके कोंबून भरलेले असतात की श्वास न घेता आल्याने खालचे प्राणी तडफडून मरतात तर बाकीचे अर्धमेले होतात. अत्यंत बारीक जाळ्यांचे पिंजरे या गाड्यांना बसवलेले असतात. त्रासदायक अवस्थेत प्राण्यांचे दुसरे काय होणार? हे प्राणी कत्तलखान्यात पोहोचतात तेव्हा दुसरे यापेक्षाही भयंकर संकट त्यांच्यापुढे उभे असते. कत्तलखान्यात फक्त जिवंत प्राणी घेतले जातात. त्यासाठी त्यांच्या जिवंतपणाची टेस्ट घेतात. हे अर्धमेले प्राणी जिवंत आहेत हे दाखवण्यासाठी त्यांच्या डोळ्यात मिरचीपूड टाकतात या वेदना सहन न होऊन जेव्हा तो प्राणी जीवाच्या आकांताने तडफड करतो तेव्हा प्राणी जिवंत असल्याची खात्री होते, तेव्हाच त्याला पुढच्या मरणासाठी कत्तलखान्यात घेतलं जातं. यानंतर माणसांचे उर्वरित काम सोपं व्हावे यादृष्टीने प्राण्यांचा विविध पद्धतीने अनन्वित छळ केला जातो. प्राणी मरण्याआधी त्याची कातडी अखंड निघून यावी यासाठी त्याच्या अंगावर २८० अंश सेल्सिअस उकळत्या ॲसिड मिश्रीत पाण्याचे फवारे मारले जातात. भीतीने अर्धमेल्या झालेल्या आणि तडफडणाऱ्या प्राण्यांचा एक पाय बांधून उलट्या अवस्थेत त्यांची मानेची नस तोडली जाते. रक्ताच्या चिळकांड्या उडू लागतात त्यांच्या शरीरातून रक्त वाहत असते हे रक्त खाली ठेवलेल्या भांड्यात गोळा होत असतं, हे रक्त पुढे औषध कंपन्यांना विकले जाते. त्यातून ट्रॉनिक्स व इतर औषधी तयार होतात. अनेक टॉनिक्स मध्ये प्राण्यांच्या रक्ताचा अंश असतो. हे कित्येकांना माहित पण नसतं. प्राण्याला टांगलेल्या अवस्थेत त्यांचं पोट फाडून त्यात हवा भरतात, त्यांची कातडी सुलभतेने निघावी यासाठी हे करतात अशा प्रकारे हाल हाल केलेला तो प्राणी मरणपंथाला लागतो. या प्राण्याला मृत्यू यायला दोन तीन तास लागतात प्राणी मेल्यानंतर त्याचे तुकडे करून हाडे, मांस, कातडी वेगळी केली जाते. यातील मांस मग विक्रीला ठेवतात त्यातून मटन, चिकन, खिमा असे चविष्ट व रुचकर पदार्थ स्वयंपाक घरातून तयार होतात, त्यावर लोक तुटून पडतात. प्राण्यांना पकडून त्यांना कत्तलखान्यात ढकलणे व असहाय प्राण्यांना छळ करून मारणे आणि त्यांचे मांस विविध मसाले घालून खाणं हा सारा मानवतेवरचा कलंक आहे. ज्या पौष्टीक आहारासाठी मांसाहार केला जातो तो मांसाहार तरी योग्य उपकारक आहे का ? याचे उत्तर पूर्णपणे नकारार्थी आहे. कोलेस्टेरॉल हा रक्तातील स्निग्ध आम्लबरोबर संयुक्तपणे असणारा महत्त्वाचा घटक. थोड्याफार प्रमाणात कोलेस्टेरॉल शरीराला आवश्यक आहे मात्र त्याचा प्रमाण वाढलं तर ते अत्यंत घातक ठरतं मांस, अंडी व इतर प्राणीजन्य पदार्थ यामध्ये कोलेस्टेरॉलचं प्रमाण भरपूर असतं हे पदार्थ खाल्ल्यामुळे रासायनिक किंवा चेताग्रहाच्या (रिसेप्टर)संख्येत घट होते. यामुळे रक्तप्रवाहात कोलेस्टेरॉलचं प्रमाण वाढतं यामुळे हृदयविकार, मूत्रपिंडाचे विकार, खडे होतात. हृदयविकृती व उच्च रक्तदाब हे विकार रक्तवाहिन्यांच्या आत कोलेस्टेरॉल साठुन होतात. अंड्यात सर्वात जास्त कॉलेस्टेरॉल असतात. १०० ग्रॅम अंडी खाण्यात आली तर शरीराच्या गरजेपेक्षा सुमारे अडीचपट कोलेस्टेरॉल शरीरात जातो. फेफरं येणं, आंत्रपुच्छचा विकार, मलाशयाचा कर्करोग असे रोग मांसाहार करणाऱ्याला होण्याची जास्त शक्यता असते.

मांसाहारातून प्रमाणाबाहेर प्रथिने पोटात जातात त्यामुळे मूत्रपिंडाचे विकार होऊ शकतात. मांसजन्य पदार्थामुळे रक्तातील युरिक आम्लाचे प्रमाण वाढतं. आम्ल सांध्यावर साठू लागतो त्यामुळे संधिवाता सारखे रोग होतात. मांसाहार केल्याने धमन्यांचा अंतर्भाग चोंदतो, अतिसार, अपचनाचा त्रास सुरू



होतो आणि आतडी कुजायला सुरवात होते.

कर्करोगाचं प्रमाण ही मांसाहारी व्यक्तीमध्ये जास्त असतं. मांसाहारामुळे रक्तप्रवाहातील विषद्रव्यांच्या विरुद्ध लढा देण्याच्या किंवा प्रतिकार करण्याच्या क्षमतेत घट होते त्यामुळे किरकोळ आजारापासून रक्षण करण्यास शरीर असमर्थ ठरते. मांसजन्य पदार्थात 'अ' जीवनसत्व असतं त्यामुळे सतत मांसाहार करणाऱ्यांना त्वचारोग होतात. डोकेदुखी, अर्धशिशी महिलांना मासिक पाळीचा अति त्रास मांसाहारामुळे होतो.

मांसाहार करण्यातून आणखी एक भयानक धोका उद्भभवतो तो प्राण्यांची झालेल्या रोगाचा. प्राणी, मासे, पक्षी यांना तसेच अंड्यामध्येही काही मूळचे रोग असतात. खाण्यासाठी प्राण्यांची हत्या करण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी केली जात नाही, यामुळे हे रोग मांस खाणाऱ्यांच्या पोटात जातात. रोगकारक विषाणू व जिवाणू यांना सहज शहरात प्रवेश मिळतो. काही प्राणी निरोगी असले तरी कत्तलखान्यात भीतीने व धक्क्याने थरथर कापत असतात. आपलं मरण त्यांना कळून चुकलेलं असतं, त्यामुळे ते एक-दोन दिवस अन्नपाणीही घेत नाहीत. भीती व बेचैनी यामुळे शौच आपोआप पाझरू लागतो. हा मल रक्तात मिसळतो व रक्त विषारी व अपायकारक बनते त्यामुळे मांसही प्रदूषित बनतं. कत्तल होण्यापूर्वी निराधार प्राणी स्वतःचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करत असतो. अतिशय क्रोध, प्रचंड भीतीची भावना त्यांच्या मनात निर्माण होते, यामुळे एनलिन हे संप्रेरक तयार होऊन रक्तात मिसळले जाते. त्यामुळे रक्तदाब वाढतो, रक्त प्रदूषित होऊन मांसात पसरते, यातून अत्यंत घातक दुष्परिणाम होऊन रोग होतात. मांसाप्रमाणे अंड्यातही अनेक दोष असतात. अंडे शाकाहारी आहे असे म्हणणे सर्वस्वी चूक आहे. अंड्याला देखील प्राणवायूची गरज असते. कवचावरील १५ लाखाच्या आसपास छिद्रातून ते श्वासोच्छ्वास करत असतं. या अफलीत अंड्यावर काही प्रक्रिया करून कोंबडीचे पिल्लू तयार करता येते. या प्रक्रियेला पार्थिनोजनेसीस म्हटलं जातं या प्रक्रियेचं शास्त्रीय वर्णन डॉ.एच.जी.वेल्स यांनी सायन्स अँड लाईफ यापुस्तकात केलं आहे. अफलीत अंड्यातही जिवंत स्त्रीबीज असतं. त्यामुळे त्याला शाकाहारी म्हणणं चूक आहे, अशास्त्रीय आहे असा निष्कर्ष शास्त्रज्ञ रॅम्पकिन्स क्रीस्तोर यांच्या ' द सिक्रेट लाईफ ऑफ प्लॉटस ' या पुस्तकात काढला आहे. त्यामुळे अंडी शाकाहारी नाही. हे तर सिद्ध झालंच आहे. शिवाय कोंबड्यांनी जास्त अंडी द्यावी यासाठी त्यांना सतत दबावाखाली व अस्वच्छ पद्धतीने पाळलं जातं. संप्रेरक व इंजेक्शन्सचा अतिरेक केला जातो. कोंबड्यांनी अंडी घातल्याबरोबर ती उबवण करणाऱ्या यंत्रात ठेवली जाते या पद्धतीचा वापर करून २१ दिवसांऐवजी अवघ्या १२ दिवसातच अंड्यातून पिल्लू बाहेर येते. त्यातील मादी पिल्ले बाजूला काढून त्यांना विशेष आहार दिला जातो. त्या लवकर मोठया व्हाव्यात म्हणून त्यांना रात्रंदिवस जागं ठेवलं जातं, रात्रीच्या वेळी प्रखर प्रकाश चालू ठेऊन त्यांना झोपू दिले जात नाही. असल्या प्रकाराने त्या लवकर अंडी द्यायला सुरुवात करतात.

कोंबडीला अशा प्रकाराने त्रास देऊन अंडी मिळत असतील तर त्यांना शाकाहारी का म्हणावे.

भारतीय विज्ञापन मापक परिषद (advertising स्टँडर्डस कऊन्सिल ऑफ इंडिया) यांच्या २६ मे १९९० च्या निर्णयानुसार अंडी ही भाजी नाही. त्यामुळे अफलीत अंडी शाकाहारी म्हणून विकणं हा सामाजिक गुन्हा आहे असं जाहीर केलं आहे. लहान मुलांना अंडी देऊ नयेत असा सल्ला हापकीन इन्स्टिट्यूटने दिला आहे. कारण यामुळे एलर्जीचे विकार, दमा, सर्दी, पचनाच्या तक्रारी व कातडीचे विकार होतात. प्रत्येक अंड्यात २०० मिलीग्राम कोलेरेस्टोल असतं. हे प्रमाण अती आहे, त्याचप्रमाणे कोंबड्याना दिली जाणारी हार्मोन्स, डी.डी.टी, अँटिबायोटिक सारख्या विषाचे अंश अंड्यात असतात यामुळे हृदयरोग झालेल्याला मांसाहार न करण्याचा तसेच अंडीही न खाण्याचा सल्ला डॉक्टर देतात. ब्रायलर चिकन मुळे हार्मोनल इनबॅलन्स होण्याचे प्रमाण वाढले आहे, ब्रायलर मध्ये अँटिबायोटिकचा वापर आजारापासून वाचण्यासाठी आणि तातडीने वाढ व्हावी यासाठी केला जातो. अँटिबायोटिक वापरात ५ देशात भारताचा पहिला नंबर लागतो.

ऑक्सिटेट्रासायक्लीन, क्लोरटेट्रासायक्लीन, डॉक्सिसायक्लीन, इन्ड्रोफ्लोक्सिन, सिप्रोफ्लोक्सिन, न्यूयोमायसीन, अमिनोग्लायकोसाईड्स या अँटिबायोटिक्सला डब्लू.एच.ओ ने मानवाकरीता खतरनाक सांगितलं आहे. टेट्रासायक्लीन आणि फ्लोरोफिनोलोन्स ही अँटिबायोटिक कॉलरा, मलेरिया आणि युरिनरी ट्रॅक इन्फेक्शनसाठी वापरले जातात.

(उर्वरित भाग उद्याच्या अंकात)

# 'मृत्यूसोबत' काम केलेल्या डॉ. वसुधा आपटे

आधुनिक केसरी

डॉ वसुधा आपटे या साध्यासुध्या डॉक्टर नाहीत. त्यांच्याखेरीज न्यायवैद्यक शास्त्र (forensic medicine) या पुरुषप्रधान क्षेत्रात गेली ४५ वर्षे सातत्याने कार्यरत असलेली उभ्या महाराष्ट्रात दुसरी स्त्री नाही ! संपूर्ण भारतात या क्षेत्रात आजच्या घडीला केवळ १४-१५ स्त्रियाच कार्यरत आहेत. डॉ आपटे यांनी जेव्हा या कार्यक्षेत्रात पदार्पण केलं तेव्हा आणि त्यानंतरही पुढची अनेक वर्षे शवविच्छेदन (Post mortem) करणाऱ्या त्या महाराष्ट्रातील एकमेव स्त्री डॉक्टर होत्या. शवविच्छेदन (Post mortem) हा शब्द आपण सिनेमात, टीव्हीवर, पेपरमध्ये अथवा अपवादात्मक परिस्थितीत आपल्या आयुष्यात आपण प्रत्येकाने ऐकलेला असतो. मात्र post mortem हा forensic medicine या वैद्यकीय शाखेतील केवळ एक भाग असतो आणि त्याच्या पलीकडे कितीतरी गोष्टी या वैद्यकीय शाखेत अंतर्भूत असतात. या दृष्टीने Forensic medicine हा विषय भारतात अजूनतरी सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचायला हवा तसा पोहोचलेला नाही, असं डॉ आपटे आवर्जून सांगतात. M.B.B.S. झाल्यावर विवाह झाल्यामुळे डॉ आपटे यांनी M.D. व LLB (G) या दोन महत्वाच्या पदव्या घरसंसार व नोकरी सांभाळून केल्या हे विशेष.

जावे त्याच्या वंशा...म्हणतात त्याप्रमाणे डॉ वसुधा आपटे ज्या क्षेत्रात काम करतात त्या कामाची कल्पना आपल्याला नुसत्या शब्दातून येणं अशक्य आहे. तुमचे रोजचे काम विविध मृत माणसांच्या शवाशी सबंधित असल्याने एका अर्थाने तुमची गाठ रोज मृत्यूशी होत असते. कुठल्या वयाची, कुठल्या पदावरील किंवा कुठल्या कारणाने मृत्यू झालेली व्यक्ती तुमच्या समोर येईल ते सांगता येत नाही. आत्महत्या, खून, संशयास्पद मृत्यू...काहीही असू शकेल. अशा वेळी मनाचा तोल ढळू न देता काम करावे लागते. शांतपणे मन एकाग्र ठेवून तुम्हाला शवविच्छेदन करावे लागते. शरीराच्या अवयवांची बाह्य व आतून तपासणी करावी लागते. त्यात कुठल्या अवयवांना इजा आहे, याच्या नोंदी ठेवाव्या लागतात. शरीरात बंदुकीच्या बुलेट्स गेल्या असतील तर त्या स्वतःच्या हाताने काढाव्या लागतात. त्या सुरक्षितपणे, सापडल्या त्या अवस्थेत (न धुता) पिशवीत जपून ठेवाव्या लागतात. अशा एक ना अनेक गोष्टी. शवविच्छेदन झाल्यावर शरीराच्या आतील अवयव चिकित्सा झाल्यावर पुन्हा एकदा होते त्या जागी ठेवावे लागतात. मग शरीर पुन्हा शिवून नातेवाईकांकडे सुपूर्द करायचे असते. यात भावनांना अवाजवी महत्व न देता, तुम्हाला कमालीचे वस्तुनिष्ठ राहावे लागते. चिकित्सा करून शांत डोक्याने निष्कर्ष काढावे लागतात. बलात्कार, खून अशा केसेसमध्ये शव विच्छेदनामुळे अनेक तथ्ये बाहेर येतात. त्यामुळे न्यायालयास अचूक न्यायदान करणे सोपे होते. तसेच शवविच्छेदन करून झाल्यावर आपल्याला हवा तसा रिपोर्ट मिळण्यासाठी उच्च व्यक्तींकडून दबाव यायची शक्यता असते. आपल्या निष्कलंकीत आणि वस्तुनिष्ठ कारकिर्दीत अनेक लोकांना न्याय देता आला व दोषी व्यक्तींना शिक्षा झाली, याचे डॉ आपटे यांना अपार समाधान वाटते.

मुख्य म्हणजे एक स्त्री या नात्याने घर सांभाळायचे असते. मुलांचे संगोपन, त्यांचे शिक्षण याची जबाबदारी अधिक असते. त्यामुळे आपण करत असलेल्या कामाचा परिणाम आपल्या घरावर होऊ द्यायचा नाही याची काळजी डॉ आपटे यांनी घेतली. यासाठी लागणारी 'मानसिक शिस्त' त्यांच्याजवळ होती, म्हणूनच ते शक्य झाले. आपली आपल्या कामावर निष्ठा असली आणि मनात येणाऱ्या विचारांचे योग्य नियोजन केले तर ही तारेवरची कसरत कठीण वाटत नाही, असे डॉ वसुधा आपटे अगदी सहजपणे सांगून जातात. एका दिवशी (मधे जेवणाचाही ब्रेक न करता केलेले)



एकाच केसमधील चोवीस लोकांचे शवविच्छेदन करण्यासाठी मनाची काय पातळी लागत असेल याचा विचार करून आपण डॉ आपटे यांना मनोमन नमस्कार केलेला बरा !

मुंबईमधील टोपीवाला राष्ट्रीय वैदयकीय महाविद्यालय व नायर रुग्णालय येथे ३२ वर्षे व सुरत महापालिकेच्या नव्या वैद्यकीय महाविद्यालयात ३ वर्षे सेवा केलेल्या डॉ वसुधा आपटे यांना अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. १९९५ मध्ये American Biographic Institute कडून Woman of the Year, सह्याद्री वाहिनीचा हिरकणी पुरस्कार, झी मराठी वाहिनीचा उंच माझा झोका पुरस्कार, नुकताच १५ ऑगस्ट २०१८ रोजी सुरत येथे मिळालेला 'Noble Asian of the Year' असे अनेक पुरस्कार आहेत.

निवृत्त झाल्यावर डॉ आपटे सध्या Medico-Legal Consultant म्हणून कार्यरत आहेत. नोकरीच्या काळात इंग्रजीत लिखाण केल्यावर त्यांनी निवृत्तीनंतर मराठीत २०० हून अधिक लेख लिहिले आहेत. 'गुन्हेगारांचा कर्दनकाळ – न्यायवैद्यक शास्त्र' हे त्यांनी लिहिलेले पुस्तक वाचकांच्या पसंतीस उतरले असून नुकताच या पुस्तकाला २०१७ सालचा प्रथम क्रमांकाचा 'सुप्रभात साहित्य पुरस्कार' मिळाला आहे.

गणेश जोशी

एवढं प्रचंड कर्तृत्व असलेल्या डॉ. वसुधा आपटे यांची एक ओळख थोडी वैयक्तिक परंतु अतिशय हृद्य आहे. न्यायमूर्ती रानडे व रमाबाई रानडे हे वसुधा ताईंचे पणजोबा-पणजी आहेत ! वसुधाताईंच्या वडिलांचा लहानपणीचा सांभाळ खुद्द रमाबाई रानडे यांनी केला आहे. त्यामुळे घरातील प्रत्येकाला सरस्वतीचे वरदान आहे. इतकंच नाही तर न्यायमूर्ती रानडे जी स्त्री पुरुष समानता समाजात रुजवू पाहत होते, ती सम्यक दृष्टी वसुधा ताईंनी आपल्या कुटुंबातील प्रत्येकात रुजवली आहे. समाजात स्त्री पुरुष समानता वाढीस लागावी, व समाजाचा स्त्रियांकडे पहायचा दृष्टीकोन अधिक निकोप व्हावा यासाठी सत्तरी उलटून गेलेल्या वसुधाताई आजही महाराष्ट्रात निरनिराळ्या ठिकाणी प्रवास करून व्याख्यानांतून समाज प्रबोधनाचे काम करत आहेत !

'इतकी वर्षे या क्षेत्रात काम केल्यामुळे मृत्यूची भीती कमी झाली. जगण्यावरचे प्रेम अधिक वाढले. आपल्या जगण्यातील प्रत्येक क्षण महत्वाचा आहे. आपण तो आनंदाने जगला पाहिजे. आपला रिकामा वेळ आपल्या आवडीच्या गोष्टी, छंद यात व्यतीत केला पाहिजे. मुख्य म्हणजे, आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेतले पाहिजे – म्हणजे आपला आनंदही द्विगुणित होतो.' इतकी वर्ष रोज 'मृत्यूसोबत' काम केलेल्या डॉ वसुधा आपटे यांची जगण्याविषयी साधीसुधी फिलोसॉफी आहे.

डॉ वसुधा आपटे या साध्यासुध्या डॉक्टर नाही, हे सुरुवातीला म्हटले ते याचसाठी !

# विकासाचे दावे आणि उपासमारीचे वास्तव



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**एकीकडे आपण भारताच्या भक्कम आर्थिक स्थितीबद्दल जगभर गोडवे गात असतो, पण हे खरे आहे की स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षानंतरही आपण काही मूलभूत समस्यांवरही मात करू शकलो नाही. उपासमारीच्या वाढत्या आकडेवारीमुळे 2030 पर्यंत भूक निर्मूलनाचे आंतरराष्ट्रीय लक्ष्यही धोक्यात आले आहे.संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या अहवालात  अघोषित युद्ध, हवामान बदल, हिंसाचार, नैसर्गिक आपत्ती यांसारखी उपासमारीची कारणे सांगितली हे किती खेदजनक आहे, पण मुक्त अर्थव्यवस्था, बाजाराची रचना, नवसाम्राज्यवाद आणि नव-उदारमतवाद हेही मोठे कारण आहेत.**

स्वातंत्र्याच्या पंचाहत्तर वर्षांनंतरही देशासाठी कुपोषण, उपासमार हा चिंतेचा विषय आहे.  गेल्या सात दशकांपासून भारत ही समस्या दूर करण्याचा प्रयत्न करत आहे. विकासाचे सर्व दावे करूनही आपण आजही गरिबी, भूक या मूलभूत समस्यांच्या विळख्यातून बाहेर पडू शकलो नाही. एकशे तीस कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या देशात आजही परिस्थिती अशी आहे की, अन्नधान्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊनही बाजारपेठेतील महागाईमुळे खूप साऱ्या लोकांपुढे खाण्यापिण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. जागतिक अन्न उत्पादन अहवालानुसार, भारतात मजबूत आर्थिक प्रगती असूनही, उपासमारीची समस्या हाताळण्याची गती खूपच मंद आहे. त्याच वेळी, संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या अहवालात असे म्हटले आहे की जगात प्रत्येक स्त्री, पुरुष आणि मुलाला पुरेल इतके अन्न आहे. असे असूनही, कोट्यवधी लोक असे आहेत ज्यांना तीव्र भूक आणि कुपोषण किंवा कुपोषणाची समस्या भेडसावत आहे.

एकीकडे आपण भारताच्या भक्कम आर्थिक स्थितीबद्दल जगभर गोडवे गात असतो, पण हे खरे आहे की स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षानंतरही आपण काही मूलभूत समस्यांवरही मात करू शकलो नाही.  उपासमारीच्या वाढत्या आकडेवारीमुळे 2030 पर्यंत भूक निर्मूलनाचे आंतरराष्ट्रीय लक्ष्यही धोक्यात आले आहे.संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या अहवालात  अघोषित युद्ध, हवामान बदल, हिंसाचार, नैसर्गिक आपत्ती यांसारखी उपासमारीची कारणे सांगितली हे किती खेदजनक आहे, पण मुक्त अर्थव्यवस्था, बाजाराची रचना, नवसाम्राज्यवाद आणि नव-उदारमतवाद हेही मोठे कारण आहेत. संयुक्त राष्ट्र संघाने यावर मौन बाळगले आहे, जरी हा एक अतिशय गंभीर मुद्दा आहे असला तरी. आजही जगातील कुपोषित लोकसंख्येचा सर्वात मोठा भाग भारतात राहतो आणि नुकत्याच प्रसिध्द झालेल्या ग्लोबल हंगर इंडेक्स (2022) मध्ये भारत 107 स्थानांवर आहे. गेल्यावर्षी 2021 मध्ये भारत 101 व्या स्थानावर होता, अशी स्थिती का आहे?

वैश्विक भूक निर्देशांकात (2022) 121 देशांच्या क्रमवारीमध्ये आपला देश 107 व्या स्थानी असून देशातील कुपोषणाचे प्रमाण देखील सर्वाधिक असल्याचे दिसून आले आहे.देशातील कुपोषणाचे प्रमाण हे 19.3 टक्क्यांवर पोचले आहे. वैश्विक भूक निर्देशांक हा आंतरराष्ट्रीय, प्रादेशिक आणि राष्ट्रीय पातळीवरील भुकेच्या प्रमाणाचे मोजमाप करण्यासाठीचा एक सर्वसमावेशक मानदंड समजला जातो. भारताचा या क्रमवारीमध्ये 20.1 अंकांसह गंभीर स्थिती असलेल्या देशांच्या श्रेणीमध्ये समावेश करण्यात आला आहे. भारताच्या खालोखाल आशियातील विपन्नावस्थेतील अफगाणिस्तानचा (109) क्रमांक लागतो. भारतापेक्षाही पाकिस्तान (99), बांगलादेश (84), नेपाळ (81) आणि श्रीलंकेतील (64) स्थिती तुलनेने बरी असल्याची बाब उघड झाली असून 2021 मध्ये 116 देशांच्या यादीमध्ये



भारत 101 व्या स्थानी होता तर 2020 साली तो 94 व्या स्थानी होता. दरम्यान, या अहवालात चुकीच्या पद्धतीने भूकेचे मोजमाप करण्यात आले असून, यात गंभीर संशोधनात्मक त्रुटी आहेत, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले. तर देशामध्ये अन्नधान्याचा पुरेसा साठा नसल्यानेच किमती वाढू लागल्या आहेत,असे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांनी म्हटले आहे. देशातील 22.4 कोटी लोक अल्पपोषित असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे.

वाढत्या भू-राजकीय संघर्ष, जागतिक हवामान बदलाशी संबंधित हवामानाची तीव्रता आणि साथीच्या रोगांशी संबंधित आर्थिक आणि आरोग्यविषयक आव्हाने यामुळे उपासमारीची पातळी वाढत आहे. कुपोषणाचे जागतिक प्रमाण वाढत चालले आहे.  आर्थिक विकास असूनही भारतासमोर कुपोषणाशी लढण्याचे मोठे आव्हान आहे. प्रश्न असा आहे की, स्वातंत्र्याच्या पंचाहत्तर वर्षानंतरही भारतातून कुपोषणाची समस्या का नाहीशी झाली?  स्वातंत्र्यानंतर भारतात अन्नधान्याचे उत्पादन पाच पटीने वाढले असले तरी कुपोषणाचा प्रश्न अजूनही एक आव्हान आहे.

कुपोषणाची समस्या म्हणजे अन्नधान्याचा तुटवडा नाही. तर ते अन्न विकत घेण्याची  क्रयशक्तीमुळे कमी असल्याचे कारण आहे. कमी क्रयशक्ती आणि पौष्टिक अन्नाचा अभाव यामुळे  कुपोषणासारख्या समस्या वाढतात.  परिणामी, लोकांची उत्पादन क्षमता कमी होऊ लागते, साहजिकच लोक गरिबी आणि कुपोषणाच्या चक्रात अडकू लागतात. मात्र, गेल्या चाळीस वर्षांत भारतात अनेक पोषण कार्यक्रम राबविण्यात आले. सन 2000 पासून भारताने या क्षेत्रात भरीव प्रगती केली आहे.

परंतु तरीही बाल पोषण हे चिंतेचे प्रमुख क्षेत्र आहे.  दरम्यान, हवामान बदलामुळे केवळ उपजीविका, पाणीपुरवठा आणि मानवी आरोग्यच नव्हे तर अन्नसुरक्षेलाही धोका निर्माण झाला आहे.  त्याचा थेट परिणाम पोषण आहारावर होतो.

जगभरात उपाशीपोटी झोपणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे हे खरे आहे. तरीही, जगात असे अनेक लोक आहेत जे अजूनही उपासमारीने त्रस्त आहेत. 2050 पर्यंत जगाची लोकसंख्या नऊ अब्जांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे आणि यापैकी सुमारे ऐंशी टक्के लोक विकसनशील देशांमध्ये राहतील. एकीकडे आमच्या आणि तुमच्या घरात रोज सकाळी रात्रीचे उरलेले अन्न शिळे म्हणून फेकले जाते, तर काही लोक असे आहेत ज्यांना एक वेळचे जेवणही मिळत नाही आणि ते उपासमारीशी झगडत आहेत. कमी-अधिक प्रमाणात प्रत्येक विकसित आणि विकसनशील देशाची ही गोष्ट आहे.  दरवर्षी जगात उत्पादित होणाऱ्या अन्नापैकी निम्मे अन्न न खाताच खराब होऊन जाते. आपल्या देशाविषयी बोलायचे झाले तर, इथेही केंद्र आणि राज्य सरकार अन्न सुरक्षा आणि उपासमारीची संख्या कमी करण्यासाठी अनेक योजना राबवत आहेत, परंतु त्याचे परिणाम जमिनी पातळीवर दिसत नाहीत. यावर कोट्यवधी रुपये खर्च केले जात असले तरी त्याचा पूर्ण लाभ गरिबांपर्यंत पोहोचत नाही.  तर अनेक दशकांपासून मोफत रोजगार, स्वस्त धान्य देऊन मतांची खरेदी करण्याचे राजकारण इथे होत आहे.

मात्र, जागतिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या गरिबी, भूक आणि अस्वच्छतेच्या बाबतीत भारताच्या मागासलेपणामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात.  त्यामुळे देशासमोरील हे सर्वात मोठे आव्हान असून, त्यामुळे जगासमोर देशाचे नाव मलिन होत आहे. अन्नसुरक्षेची संकल्पना हा भूकबळी रोखण्याचा मूलभूत अधिकार असून, त्याअंतर्गत सर्वांना त्यांच्या गरजेनुसार आवश्यक पोषक तत्वांनी परिपूर्ण अन्न वेळेवर आणि सन्मानपूर्वक उपलब्ध करून देणे हे कोणत्याही सरकारचे प्रथम कर्तव्य असले पाहिजे. भारतातील या स्थितीची अनेक कारणे आहेत.  यामध्ये वाढती गरिबी, महिलांची खालावलेली स्थिती, सामाजिक सुरक्षा योजनांची खराब कामगिरी, पोषणासाठी आवश्यक पोषक घटकांचे कमी प्रमाण, मुलींचे कमी दर्जाचे शिक्षण आणि अल्पवयीन विवाह ही कारणे भारतातील बालकांमधील कुपोषण वाढण्याची कारणे आहेत. भारताची ही परस्परविरोधी प्रतिमा खरोखरच विचार करायला लावणारी आहे.

बुलेट ट्रेनचे स्वप्न जपणाऱ्या या देशाने इतर देशांचे उपग्रह अवकाशात सोडण्याची क्षमता संपादन केली, पण उपासमारीच्या शापातून सुटका होऊ शकली नाही.  देशातील भूक निर्मूलनासाठी खर्च होणारी रक्कम कमी नाही. केंद्र सरकारच्या प्रत्येक अर्थसंकल्पाचा मोठा हिस्सा आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी खर्च केला जातो, पण त्याचे अपेक्षित परिणाम दिसून येत नाहीत. असे दिसते की एकतर प्रयत्न होत नाहीत किंवा वचनबद्धतेचा अभाव आहे किंवा जे काही चालले आहे ते चुकीच्या दिशेने चालले आहेत. भारताची लोकसंख्या आता दरवर्षी 1.04 टक्के दराने वाढत आहे हे आपण विसरू चालणार नाही. 2030 पर्यंत लोकसंख्या 1.5 अब्जांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, परंतु एवढ्या मोठ्या लोकसंख्येला पोसण्यासाठी अन्न उत्पादनात मात्र अनेक समस्या असतील.

हवामान बदलामुळे केवळ उपजीविका, पाणीपुरवठा आणि मानवी आरोग्यच नव्हे तर अन्नसुरक्षेलाही धोका निर्माण झाला आहे.  अशा परिस्थितीत, हवामान बदलाच्या धोक्यांमध्ये भारत आगामी काळात एवढ्या मोठ्या लोकसंख्येचे पोट भरण्यास तयार आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. वेळ आणि विकासासोबत भूक देखील वाढत आहे, परंतु भूकपासून दीर्घकालीन आराम देण्याचे आश्वासन देणारे काहीही दिसत नाही. या लढ्यात केंद्र आणि राज्य सरकारांसह जागतिक संघटना त्यांचे कार्यक्रम अधिक प्रभावीपणे आणि चांगल्या पद्धतीने राबवतील तेव्हाच भूकेची जागतिक समस्या सुटू शकेल. तसेच, कुपोषण दारिद्र्य, निरक्षरता, बेरोजगारी इत्यादींशी संबंधित आहे.  त्यामुळे या आघाड्यांवरही प्रबळ इच्छाशक्ती दाखवावी लागेल.

# जिथे नाही माणसांना भाव तो वेदनांचा गाव



लक्ष्मण वाल्डे
संपर्क क्र. 8888606068

आधुनिक केसरी

**इथल्या कुठल्याच वस्तू वर आपला हक्क नाही. आपण इथं पाहुण्यांनसारखं आहोत. राहायच तोवर राहायचं. बुलावा आया की लगेच कायमच सगळं जिथल्या तिथं सोडून निघून जायचं. सोबत कर्माशिवाय काहीच नेता येत नाही. आणि मागे नावाशिवाय काही शिल्लक सोडता येत नाही. चांगलं कर्म चांगलं नाव..! वाईट कर्म वाईट नाव...! हे सगळच, सगळ्यांना चांगलच ठाऊक आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात पेरलेले चांगले कर्म तुम्ही गेल्यानंतरही त्याचे वटवृक्ष होत जातो. आणि ते कर्म तुमच्या नावानिशी अमर होत राहते.**

सारं गाव आपल्या मामाच, एक नाही कामाच! जो नाही आपल्या कामाचा तो नाही आपल्या दोस्ती यारीचा असा हा मुलमंत्र आजच्या या दुनियादारीत फेरफटका मारताना दिसतोय. काही तुरळक लोक सोडले तर जवळ-जवळ सगळेच जन अनुकरण करताना दिसताय. आज नातेवाईक असो, मित्र-मैत्रिनी असो, प्रेम संबंधातले माणसे असो, ऑफिसमध्ये असो वा घरामध्ये असो, सगळेच जन आज ज्याचा त्याचा स्वार्थ पाहताना दिसताय. त्यामुळे नातेसंबंधाना तडातडा तडे जाताना दिसताय. भावनिक पोकळी पघळताना दिसतीये. आप-आपसातला विश्वासही गिळंकृत होताना दिसतोय. आज असं होताना दिसतंय की तु माझ्या कामाला. तर मी तुझ्या कामाला. काहीजण तर गोड-गोड बोलून, विश्वासात घेऊन, दुसऱ्याकडूनच काम करुन घेऊन, नंतर त्यांना ओळखही दाखवत नाहीत. अशा वृत्तीचे लोकं पाहायला मिळताय. बरेच जण असे आहे की, दुसऱ्याकडून कुठलीही अपेक्षा न ठेवता इतरांची मदत करत असतात. पण लोकांची वृत्ती अशी झाली की, जोवर माणूस कामाचा आहे. तोवर त्याच्या आजूबाजूला गोंडा घोळतांना दिसतात. एकदाच काम संपलं की, हळूहळू त्यांच्यापासून दूरावत चालतात. नंतर त्याला ओळखही दाखवत नाही. या नी त्या कारणांनी चांगल्या लोकांशी वैर करुन घेतानाचे ओरबडलेले चित्र दिसतय. काही जन तर एवढे अवघड वागतात की, पाहिलं की, चेहराच गोळा करुन घेतात. प्रेमाने बोलायला तर एवढा आळस करता की, जणू त्यांच्या बोलण्याचे युनिट पडता की काय असं होतं.

सगळ करा. पण हेवेदावे, कट-कारस्तानांपासून दूर रहा. तुमच्या या अशा स्वभावामुळे, वागणुकीमुळे तुमच्यासाठी धावून येणारी माणसं धास्तावण्याची शक्यता नाकारता येऊ शकणार नाही. अशी या जगाची रित झालेली, बदलेली दिसतीये. जोपर्यंत एखादा व्यक्ती तुमच्या कामाचा आहे. तोपर्यंत तुम्ही त्याला तुमच्या आयुष्यात किंमत देत राहतात. ज्या दिवशी तो व्यक्ती इतरांना हातभार लावण्यास अयोग्य ठरत जातो. आपल्या कामाचा नसल्यासारखा होत जातो, त्या दिवशीपासून जवळ-जवळ आपण त्याला सगळे जन निवृत करण्याच्या मागे लागण्याचे चित्र उमटताना बघायला मिळताय, मिळतात. अव्वल नंबर तर आपल्याच रक्ताचे आपल्याला, बाद करताना दिसताय. नंतर बाहेरची माणसं. अहो आपली म्हणारी-असणारी माणसं आपल्याला युज अँड थ्रो समजून आपल्याला वापरायला लागली आहे. काम संपल की संबंध संपला. अशा प्रकारे व्यवहारीकपणाची वागणूक देताना दिसत आहेत. मनात स्वार्थ आणि कपटपणा ठेवून कोण फायद्याचा, कोण बीन फायदाचा असा भेदभाव आज होताना ढळढळ दिसतंय. एखादा, दुसऱ्याच्या फायद्यावर मोठा झाला असेल आणि त्याचा फायदा करुन देणारा जर कधीनवत, अत्यंत आणीबाणीला मदतीची आशा ठेवू पाहत असेल तर त्याच्याशी हळू-हळू संबंध तोडताना काही स्वार्थ स्वभावाचे माणसं अनुभवायला, पाहायला मिळताय. अंगाशी आलं की लगेच झटकून टाकताना दिसताय.

काम सरो वैद्य मरो अशी सवय या कलयुगात अंगवळणी पछाडलेली नजरेस पडताना दिसतीये. सापासारखी वृत्ती होऊन अंगाशी येताना दिसतीये. आपण प्रेमानं आपलं म्हणून, सापाला पाळीव प्राणी म्हणून पाळण्याचा प्रयत्न करतो. त्याला दूध पाजतो.तोच साप शेवटी त्याची जात दाखवतो म्हणजे दाखवतो हे सोळा आणे सत्य आहे. आपल्याच अंगा-खांद्यावर खेळणारा साप अंगावर लाडाने खेळतोय अस आपल्याला वाटतं. पण त्याची आपल्याला खायची तयारी चालू असते. तो आपल्या शरीराचे तंतोतंत मोजमापण करत असतो हे त्याचे असे षडयंत्र आपल्या लक्षातच येत नाही. आणि एक दिवस पुर्ण तयारीनिशी आपल्यावर उलटा डाव टाकून घाव करतो आणि आपला घातपात करतो.

संत ज्ञानेश्वर झाले, छत्रपती संभाजी राजे यांनाही त्यांच्यात जवळच्या लोकांनी त्यांना फसवण्याचे, घातपात करण्याचे डावपेच खेळले असा इतिहास सांगतो. श्रीकृष्ण देव असूनही त्यांचीच घरची, रक्तांच्या नात्यांची माणसं त्यांच्या विरोधात गेल्याच इतिहास सांगतो. रामायण, महाभारततही तसंच झालं, इतिहास सांगतो. हे सगळं-सगळं तसच, सगळेच स्वार्थी. आपल्याच पात्रावर भात ओढणाऱ्या व्रतीचे बुद्धी जीवी, माणसा सारखी-माणस गद्दार होतानाची प्रथा ह्याच पुरोगामी विचारातून चालत आलेली, लोकांच्या अंगवळणी पडलेली दिसून येतीये.कुणाचं चांगल होतं तेही सहन होत नाही. थोडक्यात कुचितपणाचे भाव मनात गुदमरतांना दिसताय. पोटात खळबतांना उमटलेले दिसताय. जोपर्यंत समोरचा व्यक्ती आपल्या कामाचा, फायद्याचा शिल्लक आहे. तोपर्यंत लालची माणसं, मवळासारखी आजूबाजूला बिलगलेली, चिपकलेली दिसून येतात. विश्वासात घेऊन, तोंडावर गोड बोलणारी माणस लय भेटत असतात. त्यांना बोट दिलं की ते लगेच मनगट धरु पाहता. भोकरासारखं चिटकू पाहतात. पण तीच माणसं पाठी मागे त्याच माणसाची बदनामी करताना दिसतात. निर्लज्जपणे हे सगळं कारस्थान कशासाठी. अहो, मागच्या जन्माचे कर्म फळ की, पुन्हा मानव जिवन मिळाला. अशा या सुंदर जिवनाचा आनंद लुटायचा सोडून, कशाला फालतू वेळ वाया घालवावा. जिवन हे क्षणिक क्षणात संपणारं आहे.

पाण्यावरच्या बुडबुड्यासारखं आहे. इथल्या कुठल्याच वस्तू वर आपला हक्क नाही. आपण इथं पाहुण्यांनसारखं आहोत. राहायच तोवर राहायचं. बुलावा आया की लगेच कायमच सगळं जिथल्या तिथं सोडून निघून जायचं. सोबत कर्माशिवाय काहीच नेता येत नाही. आणि मागे नावाशिवाय काही शिल्लक सोडता येत नाही. चांगलं कर्म चांगलं नाव..! वाईट कर्म वाईट नाव...! हे सगळच, सगळ्यांना चांगलच ठाऊक आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात पेरलेले चांगले कर्म तुम्ही गेल्यानंतरही त्याचे वटवृक्ष होत जातो. आणि ते कर्म तुमच्या नावानिशी अमर होत राहते. तुमचे वाईट कर्म तुमच्या शरीरासोबत स्मशानात जळून जाते कायमचे. आता तुम्हीच ठरवा. काय चांगलं काय.. वाईट..? आपल्याला सगळं कळत पण वळत नाही. भविष्याची धडपड ही हयात नसूनही, हयात असल्याची जाणिव करुन देणारी असली पाहिजे....!

मनुष्य गौरव दिन विशेष

# माणसाला समाजात माणूस म्हणून वागायला शिकवणारे सत्पुरुष : प. पू. पांडुरंग शास्त्री आठवले



संतोष निकम
संपर्क क्र. 9545832704.

आधुनिक केसरी

**माणसाचे माणसाशी माणसाचे सृष्टीशी आणि माणसाचे भगवंताशी नाते दादांनी जोडले. आज लाखोंच्या संख्येने स्वाध्यायी आमच्या अवतीभवती प्रेम आणि विचार वाटत फिरतात. तरीही हे कार्य आम्हाला ठळक वाटावे असे दिसत नाही. कारण ते प्रचार करत नाही, पोस्टर लावत नाही, जाहिरात करत नाही. ते खऱ्या अर्थाने मनुष्य गौरव निर्माण करताहेत ते सरळ हृदयात शिरतात आणि माणसाला हृदयापासून बदलून टाकतात. माणसात खऱ्या अर्थाने मनुष्य गौरव निर्माण करणाऱ्या पूजनीय दादाजींच्या चरणी शताब्दी निमित्ताने हृदयपूर्वक कोटी कोटी वंदन जातो.**

तेजस्वी विचारधारा जनसामान्यापर्यंत पोहोचवण्याचे फार मोठे विशाल असे भगवत कार्य ह्या भूमीवर भगवंताने पाठवलेल्या ज्या महापुरुषांनी साकार करून दाखवलं ती जगविख्यात शक्ती म्हणजे परमपूज्य पांडुरंग शास्त्री आठवले. म्हणजेच स्वाध्यायींचे दादा. पुजनीय दादाजींचा जन्मदिन स्वाध्याय परिवार मनुष्य गौरव दिन म्हणून पूर्ण विश्वात साजरा करतात. १९ ऑक्टोबर १९२० रोजी कोकणातील रायगड मधील रोहा या गावी या महापुरुषाचा जन्म झाला. ज्यांनी माणसाला माणसाची ओळख करून देऊन प्रत्येकाला समाजात माणूस म्हणून वागायला शिकविले तो सत्पुरुष म्हणजे परमपूज्य पांडुरंग शास्त्री आठवले होय. संपूर्ण भारतात ते दादाजी या नावाने प्रसिद्ध आहे गीता, तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक, तत्वचिंतक, क्रियाशील समाजसुधारक आणि स्वाध्याय परिवाराचे ते प्रणेते. यापूर्वी गीतेवर आधारित संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून समाजाला दिशा दिली. परंतु दादाजींनी याच गीतेचा अर्थ ज्ञान, कर्म, भक्ती यात्रिसूत्रीच्या बंधनात बांधून जो संगम साधला ती अन्य कोणालाही जमला नाही. त्यांचे आजोबा लक्ष्मणशास्त्री आठवले हे विद्वान पंडित होते. त्याकाळी समाजाचा विरोध पत्करून त्यांनी दलितांना गीता शिकविली. दादाजींच्या वडिलांनी स्थापन केलेल्या पाठशाळेत लहानपणापासून दादाजींनी प्रवचने देण्यास प्रारंभ केला. वारसा हक्काने आजोबांची विद्वत्ता नातवाला मिळाली होती. त्यामुळे त्यांच्या हातून एवढे महान कार्य घडले असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. स्वाध्याय म्हणजे स्वतःचा अभ्यास, कोहम मी कोण? याची ओळख म्हणजे स्वाध्याय. मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव, देव बाजारचा भाजीपाला नाही रे, असे संत तुकडोजी महाराज यांनी निर्मात्याच्या बाबतीत म्हटले आहे. तर दादाजी यांनी म्हटले आहे की तुम्ही मंदिरात देव काय शोधता? अरे तो तर तुमच्या हृदयात आहे भगवंताने स्वतः गीतेत सांगून ठेवले आहे. सर्वस्य चाहं हृदयी सन्निविष्टो पुढे ते म्हणतात तुमच्यासमोर जिवंत माणूस उभा आहे त्याच्या आत जे तत्व आहे तेच तुमच्यातही आहे. त्याचा आदर करा, सत्कार करा, मान सन्मान करा. प्रत्येक मनुष्याचा गौरव करा तेथेच आपल्याला देव मिळतो. समाजात बघितले तर पद प्रतिष्ठा आणि पैसा या तीन गोष्टीला जास्त महत्त्व आहे. प्रत्येक जण या गोष्टी मागे धावतो आहे. स्वतःचे अस्तित्व हरवून गेला आहे. माणूस मोठा का तर त्याच्याकडे पैसा आहे म्हणून, मोठे पद आहे म्हणून, प्रतिष्ठा आहे म्हणून मोठा मात्र यात कुठेतरी माणूस म्हणून माणूस पण हरवून गेले आहे. ज्याच्याकडे जास्त पैसा आहे तो कमी पैशावाल्याला तुच्छ समजतो तर त्याच्यापेक्षा अधिक पैसेवाला दिसला की स्वतःला लहान समजतो. हेच पद प्रतिष्ठेच्या बाबतीतसुद्धा लागू होते. माणूस म्हणून मोठा आहे असे दिसत नाही. त्याच्याकडे काय आहे यावरून माणसाची किंमत ठरते आणि हीच बाब दादाजींना खटकत होती त्यांना वाटायचे की पद, प्रतिष्ठा आणि पैसा यांच्याशिवाय माणसाचे काहीच मूल्य नाही का? दुधात साखर केशर इलायची खोबर घातले तर दुधाची किंमत वाढेलच पण दुधाला स्वतःची पण एक किंमत आहे. ती म्हणजे अस्मिता किंवा आत्म गौरव आणि हा आत्मगौरव माणसाला उभा करतो त्याला शक्तिशाली बनवतो. माणूस हा न्यूनगंड भयगंड आणि अहंगंड या तीन गंडांनी ग्रस्त होतो. या मानसशास्त्रावर दादांनी तोडगाच शोधून काढला, सामान्यातल्या सामान्य माणसात दादांनी अस्मिता उभी केली. दादांनी समजावले की या सृष्टीचा पालन करता भगवंत तुझ्या शरीरात येऊन बसला आहे. जर या सृष्टीला चालविणारा तसेच माझे शरीर चालविणारा भगवंत जर माझ्या सोबत असेल तर मग मी छोटा कसा असेल. मला दोन शर्ट कमी आहेत म्हणून मी छोटा नाही. मी भगवंताचा आहे म्हणून मी मोठा आहे. त्यामुळे माणसात आत्म गौरव निर्माण झाला त्याचा न्यूनगंड



गळून पडला. भगवंतावर प्रीतीतून भक्ती निर्माण झाली. भगवंतावर बौद्धिक प्रेम निर्माण झाले. मी भगवंतामुळे मोठा आहे त्यातून अहंगंड गळाला आणि भगवंतच माझ्या सोबत आहे ही जाणीव झाल्याने भीती निघून गेली. मला जसे देवाने निर्माण केले आहे आणि तो माझ्यासोबत माझ्या हृदयात राहतो आहे. माझे जीवन चालवतो आहे तसाच तो भगवंत दुसऱ्यात पण आहे म्हणजेच त्याचा आणि माझा काहीतरी संबंध आहे ही जाणीव म्हणजेच पर सन्मान. आत्म गौरव आणि परसन्मान मिळून मनुष्य गौरव तयार होतो. दादा आयुष्यभर मनुष्य गौरवासाठी झिजले, म्हणून मनुष्य गौरव हे जणू स्वाध्यायाचे दुसरे नावच आहे.

माणूस चांगला बनावा माणूस कृतज्ञ बनावा लाखो लोकांचा एक परिवार बनावा हे ध्येय दादाजींनी अंगीकारले आणि त्यासाठी अहो रात्र फिरले आणि ते स्वप्न साकार केले. स्वाध्याय म्हणजे चांगले जीवन आनंदी जीवन आणि प्रभुला आवडेल असे जीवन जगण्याची पद्धती. स्वाध्याय म्हणजे अध्ययन, स्वतःचा जीवन विकास. स्वाध्याय म्हणजे निस्वार्थ प्रेम करण्याचा अभ्यास, स्वाध्याय म्हणजे दिव्यत्वाचा ध्यास, स्वाध्याय म्हणजे एक जीवन वृत्ती, स्वाध्याय म्हणजे एक विचार प्रवृत्ती, स्वाध्याय म्हणजे एक संस्कृती, स्वाध्याय म्हणजे सदवृत्ती, स्वाध्याय म्हणजे एक विश्व कुटुंब. दादांनी स्वाध्यायाचे रोपटे लावले त्याला प्रेम आणि विचारांचे खतपाणी घातले. केवळ विचार देऊन दादाजी थांबले नाही तर ते विचार घेऊन हार्ट टू हार्ट गेले. माणसाला उभे केले माणसाला घडवले त्रिकाल संध्या, स्वाध्याय केंद्र, युवा केंद्र, बाल संस्कार केंद्र, युवती केंद्र ,महिला केंद्र, मानाहार केंद्र, प्रवचन केंद्र, आदि केंद्रातून ज्ञान आणि भक्ती फुलवली तसेच योगेश्वर कृषी, निर्मलनीर वृक्ष मंदिर, हिरामंदीर, मत्स्यगंधा, भावफेरी, भक्ती फेरी, तीर्थयात्रा, एकादशी, वृत्ती आदी विविध प्रयोगातून स्वाध्यायी कर्मभक्ती करू लागले. माणसाचे माणसाशी माणसाचे सृष्टीशी आणि माणसाचे भगवंताशी नाते दादांनी जोडले. आज लाखोंच्या संख्येने स्वाध्यायी आमच्या अवतीभवती प्रेम आणि विचार वाटत फिरतात. तरीही हे कार्य आम्हाला ठळक वाटावे असे दिसत नाही. कारण ते प्रचार करत नाही, पोस्टर लावत नाही, जाहिरात करत नाही. ते खऱ्या अर्थाने मनुष्य गौरव निर्माण करताहेत ते सरळ हृदयात शिरतात आणि माणसाला हृदयापासून बदलून टाकतात. माणसात खऱ्या अर्थाने मनुष्य गौरव निर्माण करणाऱ्या पूजनीय दादाजींच्या चरणी शताब्दी निमित्ताने हृदयपूर्वक कोटी कोटी वंदन जातो.

# होईल का हो यंदा फटाकेमुक्त दिवाळी ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारतात अनेक प्रकारचे सण साजरे केले जातात, पण दीपावलीबद्दल काहीतरी वेगळंच आहे. दिवाळीच्या उत्सवाच्या प्रकाशात चमकणाऱ्या प्रकाशाने सर्वांचे जीवन उजळले पाहिजे. प्रत्येक वर्षी जादा फटाके उडविले जातात, ज्यामुळे प्रदूषण शिगेला पोहोचत असते. सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक वेळी फटाके खरेदी करण्यास बंदी घातली आहे, परंतु तरीही लोक आनंदासाठी फटाके फोडतात. यामुळे प्रदूषण वाढते. किती बेडर आहोत आम्ही! दिवाळी हा सण खरा तर दिपोत्सव आहे, म्हणून त्यास दीपावली असे सुद्धा म्हणतात. परंतु त्यात हे फटाके फोडणे कुठून घुसले? काही समजत नाही. पुर्वी दुष्ट शक्तींना जवळपास फिरकू न देण्यासाठी ढोलसारखी वाद्ये वाजवली जायची. कदाचित दिवाळीसारख्या मंगल सणांमध्ये दुष्ट शक्तीचा वावर नको; म्हणून फटाके वाजवण्याची प्रथा आली असावी, असे वाटते.**

फटाकेनिर्मितीत वापरल्या जाणाऱ्या रसायनांमुळे अनेक प्रकारचे आजार संभवतात. फटाके फोडल्यामुळे हवा आणि वातावरण दूषित होते. परिणामी श्वसनाचे आजार वाढतात. ध्वनीप्रदूषणाची पातळीही वाढते. मोठ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे श्रवण क्षमता कमी होते. फटाके फोडल्यामुळे कार्बन मोनॅक्साईडसारखे विषारी वायू वातावरणात पसरतात. ओझोनचा थर पातळ होतो. एकदा मराठी विज्ञान परिषदेचा फटाक्यामागील विज्ञान या कार्यक्रमात फटाक्यात वापरल्या गेलेल्या रसायनांबद्दल स्लाईड शो कार्यक्रम दाखवला होता. कॉपरमुळे श्वसननलिकेत त्रास, कॅडमियममुळे किडनीला धोका आणि ॲनेमिया, शिशाचा मज्जासंस्थेवर परिणाम अशा अनेक गोष्टी सांगितल्या होत्या. तपशीलात थोडाफार फरक असू शकतो. अशा प्रदुषण करणाऱ्या फटाक्यांपासून मुक्त राहून दिवाळी साजरी करता येणार नाही का? नक्कीच येईल. फटाक्याशिवाय दिवाळी ही कल्पनाच काहींना करवत नाही. कारण दिवाळी आणि फटाके यांची संलग्नता मेंदुमध्ये ठामपणे कोरली गेली आहे. पिढ्या न् पिढ्या ती संक्रमित होत गेली आहे.

भारतात अनेक प्रकारचे सण साजरे केले जातात, पण दीपावलीबद्दल काहीतरी वेगळंच आहे. दिवाळीच्या उत्सवाच्या प्रकाशात चमकणाऱ्या प्रकाशाने सर्वांचे जीवन उजळले पाहिजे. प्रत्येक वर्षी जादा फटाके उडविले जातात, ज्यामुळे प्रदूषण शिगेला पोहोचत असते. सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक वेळी फटाके खरेदी करण्यास बंदी घातली आहे, परंतु तरीही लोक आनंदासाठी फटाके फोडतात. यामुळे प्रदूषण वाढते. कधीकधी फटाके अपघाताचे रूप घेऊ शकतात. फटाके फोडून व्यक्ती अनेक प्रकारच्या अपघातांना आमंत्रित करतो, अशा अपघातांमुळे बरेच लोक आपले अमूल्य प्राण गमावतात. आपण फटाकेमुक्त दिवाळी का साजरी करत नाही? ज्यात प्रदूषणाचा काहीच मागोवा नाही. वायुप्रदूषण, भुप्रदूषण व अत्याधिक ध्वनिप्रदूषण होते. दिवाळीदरम्यान सतत फटाक्यांच्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषण होते, ज्यामुळे मनुष्य आणि प्राणी दोघांनाही बरीच समस्या उद्भवत आहे. ज्यायोगे अनेक प्रकारच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. फटाक्यांच्या अचानक आवाजाने मुले घाबरत आहेत. फटाक्यांमुळे मोठा स्फोट होतो, ज्यामुळे प्राणी पक्षी घाबरतात आणि कधीकधी तर ऐकण्याची क्षमताच



गमावतात, बहिरे होतात. ध्वनी प्रदूषणामुळे प्रौढांना अस्वस्थ वाटते. दिवाळीत आपण पर्यावरणाला हानी पोहोचविणार नाही, अशा प्रकारे साजरी केली पाहिजे. आजकाल लोक एकमेकांना इको फ्रेंडली दिवाळी म्हणून शुभेच्छा देतात. इको फ्रेंडली दिवाळी म्हणजेच पर्यावरण अनुकूल आहे. दिवाळी हा सण आहे, ज्यात आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांसह साजरा करतो. फटाक्यांच्या मागे जर आपण आपले हजारो रुपये खर्च न करता त्याची निराधार आणि गरजूंना मदत केली तर आपली दीपावली शुभ व अपार आनंदाने भरून जाईल. दीपोत्सव खऱ्या अर्थाने आनंदोत्सव प्रतित होईल. गरजू लोकांना कपडे आणि मिठाई भेट द्या. अनाथ आश्रमात जा आणि मुलांना आवश्यक वस्तू भेटी म्हणून द्या. त्यांच्याबरोबर वेळ घालवा, त्यांच्यात रमा. आपल्या घरांना प्रकाश देण्यासाठी दिवे लावा. आपण घरी चिकणमातीचे दिवे रंगवू शकता आणि सजावट करू शकता. आपण घरात बसू इच्छित असल्यास आपण अद्वितीय, सुंदर स्कायलाईट- आकाशकंदील बनवू शकता, आपण घरे आकर्षक असे सजवू शकता. दिवाळीच्या दिवशी संपूर्ण घरात दिवे उजळा म्हणजे जीवनातील अंधकारमय त्रास दूर होईल. बहुतेक लोक सजावटीसाठी इलेक्ट्रॉनिक्स दिवे वापरतात, यात जास्त वीज वापरली जाते. त्याच्या जागी आम्ही एलईडी लाइट वापरू शकतो. दिवाळीच्या दोन दिवसांत आपण आणि आपले नातेवाईक पर्यावरण सहलीला जाऊ शकतो. त्यानंतर घरी येऊन आपण साखर, कोरडे फळे, हरभरा पीठ, रवा यांसारख्या पदार्थांचा वापर करून वेगवेगळ्या प्रकारची मिठाई बनवू शकतो. रंगीत मिठाईंचे मिश्रण बाजारात बऱ्याचदा पारखले जाते. हे टाळण्यासाठी घरी बसून भोजन करा आणि आपल्या शेजारच्या लोकांना खायला द्या. दिवाळीत आपण सर्वजण घराची सामग्री आणि बागेच्या फुलांचा वापर करून एकत्र रांगोळी बनवू शकतो. आम्ही कला आणि हस्तकला सामग्रीचा वापर करून विचित्र आणि अद्वितीय सजावट देखील करू शकतो. आपण ही दिवाळी फटाके न पेटवता आपल्या प्रियजनांशी प्रेमाने साजरी करू शकतो. पाहुण्यांना मिठाई देण्यासाठी आम्ही केळीची पाने ही प्लास्टिक व कागदी प्लेटऐवजी वापरली पाहिजेत. कारण केळीची पाने आरोग्यवर्धक आहेत, यामुळे भुप्रदूषण होत नाही. आपण विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करू शकतो आणि दिवाळीचा उत्सव रंगीबेरंगी बनवू शकतो.

दीपावलीच्या शुभप्रसंगी फटाके जाळण्याची गरज नाही. यामुळे पृथ्वीवर समस्या उद्भवतात. हवेला दूषित केल्याने मानवाचे आणि प्राण्यांचे आयुष्य समस्यांच्या चक्रात अडकते. फटाक्यांचे दुष्परिणाम जाणूनही मानव स्वतःचा विनाश स्वतःच करू लागला आहे. लोकांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. पर्यावरणपूरक दिवाळी आपला उत्सव अधिक चांगला व मजेदार करू शकते. फटाके जाळून आम्ही क्षणिक आनंदासाठी प्रचंड आणि भयंकर प्रदूषणाला आमंत्रित करत असतो, हे विसरता कामा नयेच! कालसुसंगत नसलेल्या अनेक प्रथा व परंपरा आज पाळल्या जातात. खरे तर कालबाह्य रुढी-परंपरा या एक प्रकारच्या अंधश्रद्धाच नाही का? मनाला वाटणाऱ्या असुरक्षिततेमुळे ते मोडण्याचे धाडस आज बऱ्याच लोकांना होत नाही. अंधश्रद्धा निर्मुलनाची चळवळ ही एक व्यापक समाज परिवर्तनाची चळवळ आहे. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलन समिति फटाकेमुक्त दिवाळीचे अभियान नेहमी राबवते. विद्यार्थ्यांतही पर्यावरण जागृतीचे प्रमाण वाढू लागल्यामुळे त्यांना फटाकेमुक्त दिवाळीचे महत्त्व पटू लागले आहे. काही सुसंस्कृत पालकही आपल्या मुलांना फटाक्यांचे दुष्परिणाम पटवून त्यापासून परावृत्त करू लागले आहेत. डॉ.नरेंद्र दाभोलकरांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी काही युवकांनी व विद्यार्थ्यांनी स्वतःहून फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचे ठरवले आहे. पाहू या, काय होते ते?!! मनमस्तिष्कात प्रकाश पाडणाऱ्या प्रकाशोत्सवाच्या सर्व सूज्ञ भारतीय नागरिकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छाजी !!

# रेशनकार्डवरील एक किलो गव्हाने गरिबांचे पोट भरेल ?

आधुनिक केसरी न्यूज

संदीप मानकर

**सिल्लोड :** सामान्य वर्गातील गोरगरिबांना प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत धान्य वाटप केले जाते. या योजनेअंतर्गत पाच किलो मोफत धान्य दिले जात आहे. मात्र गोरगरिबांना मिळणाऱ्या धान्याच्या वाटपात सरकारने कटोती करून प्रति व्यक्ती एक किलो गहू चे वाटप केले जात आहे. मात्र या एक किलो गहूमध्ये गरिबाचे पोट भरेल का? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे.

विदेशातून येणाऱ्या रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धामुळे देशात गव्हाचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे केंद्र सरकारने या योजनेंतर्गत राज्याला देण्यात येणाऱ्या गव्हाला लगाम लावली आहे. सर्वसामान्यांना आधार असलेला रेशनचा मोफत गहू ३ किलो ऐवजी एक किलो मिळत असून 4 किलो तांदूळ मिळत आहे. या आधी 3 किलो तांदूळ व 2 किलो गहू असे पाच किलो धान्य लाभार्थ्यांना वाटप केले जात होते. मात्र आता गहू कमी करून तांदूळ वाढविला आहे. कार्डधारकांना अल्प दरातील धान्य अधिक मोफत असे दुप्पट



धान्य घरात येत आहे. कोरोनामुळे केंद्र शासनामार्फत पंतप्रधान गरीब कल्याण योजनेतर्गत गरिबांना मार्च एप्रिल 2020 पासून मोफतचे धान्य देण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्री यांनी गरीबांना मे 2021 या एक महिन्यासाठी मोफत धान्य वाटपाची योजना जाहीर केली होती. पुरवठा विभागात स्वस्त धान्य माध्यमातून धान्याचे वितरण करण्यात येते. अंत्योदय कार्डधारकांना 5 किलो गहू व 3 कि तांदूळ 1 किलो साखर व प्राध्यान्य गटातील प्रत्येक लाभार्थ्यांना 3 किलो गहू व दोन किलो तांदळाचे वाटप करण्यात येते. मात्र आता या सरकारच्या अन्न, नागरी पुरवठा संरक्षण विभाग विभागाने कटोती केली आहे. यामुळे सर्व गोर गरीब कुटुंबे एक किलो गहू मध्ये महिनाभर उपजिवीका करणारच कसे ? असा अवघड आणि अवजड प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.



# बाल पैलवानांनी ऑलिंपिक कुस्ती स्पर्धेचे टार्गेट दृष्टीपुढे ठेवावे

## प.पू. शांतिगिरीजी महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** वेरूळ निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज यांचे कृपाशीर्वाद व उत्तर अधिकारी श्री श्री 1008 महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या पावन सानिध्यात व मार्गदर्शनाखाली आज रविवार 16/10/2022 रोजी श्री संत जनार्दन स्वामी आश्रम श्रीक्षेत्र वेरूळ येथे जय हनुमान व्यायाम शाळा श्री संत जनार्दन स्वामी गुरुकुल अंतर्गत शालेय कुस्ती स्पर्धा राष्ट्रनिर्माण धर्मसोळा निमित्ताने बाबाजींच्या 33 व्या पुण्यस्मरणार्थ मोठ्या उत्साहात पार पडल्या. बाबाजीच्या शुभ हस्ते सलामी कुस्ती सुयोग अहिरे वेरूळ आणि शुभम ताठे उगाव खेडे गुरुकुल ह्या बाल पैलवान यांनी आपसात झुंज देऊन उपस्थितांचे टाळ्या मिळवल्या. एकूण 27 लढत लावण्यात आल्या, याप्रसंगी कुस्ती प्रक्षिशिक्षक शिक्षक सौरभ शिंदे आणि जय बाबाजी भक्त परिवार प्रवक्ता आश्रमीय संत रामानंदजी महाराज जय बाबाजी भक्त परिवाराची जिल्हा सेवक तालुका सेवक तसेच गाव सेवक यांच्यासह कुस्तीप्रेमी प्रेषक हजर होते. विजेत्या मल्यांना गोल्ड मेडल सिल्वर मेडल आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

# विविध मागण्यांसाठी भर पावसात राष्ट्रवादीचे ठेचा भाकर आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

सागरकुमार झनके

**जळगाव जा :** परतीच्या पावसाने या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात शेतकऱ्याचे अतोनात नुकसान केले आहे. कपाशी, सोयाबीन या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. दिवाळीसारख्या सनासुदिच्या दिवसात शेतकऱ्यांच्या जीवनात अंधाराचे सावट पसरत असताना शिंदे-फडणविस सरकार मात्र कमालीची उदासिनता दाखवत आहे. पावसामुळे शेतकऱ्यांच दिवाळे निघत आहे. त्यामुळे या देशाचा कना असलेला शेतकरीराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. त्याचे दुःख, वेदना, समजून घ्यायला या सरकारला वेळच नाही. त्यामुळे सरकारला झोपेतून जागी करण्यासाठी, महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करावा, कोणतेही निकष न लावता पिकविमा



मंजूर करावा, हेक्टरी ५०,००० रूपये मदत जाहीर करावी, लंम्पी आजारामुळे मृत्यूमुखी पडलेल्या जणावरांच्या शेतकरी बांधवांना मदत करावी या मागणीसाठी भर पावसात राष्ट्रवादीच्या जळगाव जामोद तालुका आणि शहर कमिटीच्या वतीने जळगाव जामोद येथे उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर ठेचा भाकर खावून आंदोलन करण्यात आले.

आंदोलन चालू असताना अचानक पावसाने जोर धरला. पावसाच्या सरी कोसळायला लागल्या अशा परिस्थीतीतही शिंदे-फडणवीस सरकारचा निषेध करत पन्नास खोके, ऐकदम ओकेच्या घोषणाबाजीने सर्व परिसर दणानून गेला होता. यावेळी उपविभागीय अधिकारी कार्यालयात कोणतेही अधिकारी, कर्मचारी हजर नव्हते त्यामुळे अधिकाऱ्याच्या खुर्चीलाच निवेदन देण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादीचे पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रसेनजीत पाटील, रंगराव देशमुख, प्रकाश ढोकणे, अजहर देशमुख, अँड. संदिप उगले, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख रोहित पवार, पराग अवचार, प्रमोद सपकाळ, महादेव भालतडक, एम.डी.साबीर, वर्षा वाघ, आशीष वायझोडे, दत्ता डिवरे, अनूप महाले, दादाराव धंदर, श्रीकृष्ण जाधव, चाँद शहा,रोगेश बोराखेडे यांचेसह राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर हजर होते.

# पिंपळगाव दाणी जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतला रेल्वेचा आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** तालुक्यामध्ये आजपर्यंत कधीही रेल्वे आली नव्हती. लहान बालकापासून ते वयोवृद्धापर्यंत रेल्वेची आस लागून राहिली होती. मात्र गेल्या महिन्यांमध्ये नगर ते आष्टी रेल्वे नियमितपणे सुरू झाली. त्यामुळे सर्वांचाच आनंद गगनात मावेनासा झाला. आष्टी तालुक्यातील चिमुकल्या लहान मुलांनी रेल्वे फक्त यात्रेत किंवा चित्रपटातच पाहिली होती. मात्र प्रत्यक्षात रेल्वे मध्ये बसण्याचा योग आला आणि चिमुकल्यांचे चेहरे प्रफुल्लित झाले. आष्टी तालुक्यातील पिंपळगाव दाणी जिल्हा परिषद शाळेमधील 50 चिमुकले व पालक रेल्वेची सफर करण्यासाठी सोलापूरवाडी ते आष्टी सहलीला गेले. आष्टी तालुक्याचे रेल्वेचे स्वप्न साकार झाल्याने आष्टी तालुक्यातील नागरिकांचे रेल्वेत बसण्याचे स्वप्न साकार होत आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांचेही रेल्वेत बसण्याची स्वप्न पूर्ण होत आहे. आष्टी तालुक्यातील पिंपळगाव दाणी जिल्हा परिषद शाळेतील 50विद्यार्थ्यांचे रेल्वेत बसण्याची स्वप्न जिल्हा परिषद शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.शिवाजी जगताप यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने अनावश्यक खर्च टाळून स्वखर्चाने सर्व शाळेतील मुलांना दिला रेल्वे प्रवासाचा आनंद मिळवुन दिला.

सोबत शाळेचे मुख्याध्यापक काकडे सर सह शिक्षक ओव्हळ सर व भूकन सर शालेय समितीचे अध्यक्ष शिवाजी जगताप गावचे उपसरपंच ईश्वर साके माजी सरपंच अतुल खराडे माजी उपसरपंच बप्पू खराडे ग्रामस्थ गोवर्धन ढगे संतोष खोटे बंडू ढगे नाना खराडे खोटे राहुल शेख शौकत बंडू साके जगन्नाथ काकडे महिला रेखा जगताप अश्विनी ढगे गावातील युवक यांच्या सहकार्याने ते आष्टी रेल्वेने 50विद्यार्थ्यांनी व पंचवीस युवकांनी प्रवास केला. शाळेची सहल सोलापूर वाडी स्टेशन ते आष्टी रेल्वेने मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

# दिवाळीत फटाके फोडताना घ्या सुरक्षेची काळजी : माजी सभापती धरमसिंग चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** दिवाळीत फटाके फोडताना सुरक्षेची काळजी न घेतल्यास अपघाताची शक्यता असते. हे टाळण्यासाठी व आनंदात दिवाळी साजरी करण्यासाठी सुरक्षितता बाळगणे महत्वाचे आहे. आग लागल्यास १०१ डायल करा दिवाळी हा प्रकाशाचा, आनंदाचा सण आहे. मात्र, हा सण साजरा करताना अनेकदा अघटित घटना घडतात. त्या घटना घडू नयेत यासाठी सुरक्षितरीत्या दिवाळी साजरी करावी. ग्रीन फटाके लावताना विशेष काळजी घ्यावी. आगीची घटना घडल्यास तत्काळ १०१ या क्रमांकावर संपर्क साधा किंवा आपल्या नजीकच्या मनपा अग्निशमन केंद्राला माहिती द्या, असे आवाहन माजी सभापती धरमसिंग चव्हाण असे आव्हान केले आहे. शासनाने ग्रीन फटाके फोडण्यासाठी परवानगी दिली आहे. तसेच दिलेल्या सूचनांचे पालन करावे. ग्रीन फटाके फोडताना सुरक्षेबाबत योग्य खबरदारी घेतली जावी, असे आवाहन माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे. फटाक्यांची दुकाने लावताना आवश्यक खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. दुकान तयार करताना ज्वलनशील साहित्याचा वापर करू नये, दोन दुकानांमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे, अधिकृत प्रमाणित दर्जाचे फटाके ठेवावे, दुकानाच्या जवळ कुणालाही फटाके फोडू देऊ नये, दुकानात मेणबत्ती, लायटर किंवा आगपेटी जाळू नये, दुकानात धूम्रपान करू नये, इलेक्ट्रिक बल्ब आणि फटाक्यांमध्ये अंतर ठेवावे, जारी केलेल्या निर्देशांनुसार पाणी, रेतीची बादली आणि अग्निशमन यंत्र दुकानात ठेवावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.



- फटाके जाळताना फटाक्यांच्या बॉक्सवरील सुरक्षाविषयक सूचनांचे पालन करावे.
- फटाके फोडताना नेहमी पाणी आणि रेतीची बादली जवळ ठेवावी.
- फुलझडी, रॅकेट वापरून झाल्यानंतर त्यांना पाणी किंवा रेतीच्या बादलीत टाकावे.
- घरांच्या खिडक्या आणि दरवाजे बंद ठेवावे, फक्त अधिकृत मानक फटाके वापरावे.
- फटाक्यांसाठी खुली जागा सुरक्षित असते, वस्तीमध्ये फटाके फोडणे टाळावे.
- सुती कपडे तसेच सुरक्षेचा दृष्टीने बूट आणि चष्मा लावावा.
- फटाके फोडताना वृद्ध, मुले आणि महिलांची काळजी घ्यावी.
- लहान मुलांच्या हातात फटाके देऊ नये.
- न फुटलेल्या फटाक्यांना हात लावू नये, घरात किंवा घराच्या अगदी जवळ फटाके फोडू नये.
- फटाक्यांजवळ दिवे, अगरबत्ती किंवा मेणबत्ती ठेवू नये.
- आपल्या परिसरातील ज्वलनशील कचरा नष्ट करावा.
- अनार तसेच वर जाणारे फटाके वस्तीत फोडू नये.




आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# निरोगी आयुष्यासाठी दररोज रनिंग करा

## पुण्यातील २५ धावपटूंनी धानोरी ते जेजुरी पार केले ५५ किलोमीटरचे अंतर अवघ्या ५ तास ७ मिनिटांत

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** काहीतरी वेगळे करण्याची उर्मी प्रत्येकाला असते आणि ह्याच भावनेतून व नागरिकांना व्यायामाची जाणीव व्हावी तसेच आपले शरीर निरोगी रहावे यासाठी स्पोर्टिफ़ाय रनिंग ग्रूप धानोरी पुणे कायम नव-नवीन व धाडसी उपक्रम राबवित असते. २०२१ मध्ये धानोरी ते सिंहगड रिले रेस ४२ किमी फक्त ३ तासात ४३ मिनिटे मध्ये पूर्ण केली होती. ह्यावर्षी रविवार १६ ऑक्टोबर ला स्पोर्टिफ़ाय रनिंग ग्रूप ने धानोरी ते जेजुरी रिले रेस चे आयोजन केले होते. ह्या रेस मध्ये २५ रनर्स होते आणि ५५ किमी चे अंतर ५ तास ७ मिनिट मध्ये पूर्ण केले आहे. धानोरी - लोहगाव - पुणे एअरपोर्ट - कल्याणी नगर - मगरपट्टा - हडपसर - फुरसुंगी - दिवे घाट - सासवड - जेजुरी असा या रन रेस चा मार्ग होता. धानोरी ते जेजुरी ह्या रन रेस ला धानोरी हुन पहाटे ४ वाजता स्पोर्टीफाय संघटनेतर्फे मुख्य प्रशिक्षक विजय बनसोड यांनी हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ केला. अंतिम टप्पा सकाळी ९ वाजून ७ मिनिटे वाजता खंडेरायाच्या पावन नगरीत जेजुरीत खंडेरायाचे दर्शन घेऊन संपन्न झाला.या रिले रेस मध्ये महिलांची मोठी उपस्थिती होती.

अंकित सिंग, आशिष पठाडे, आकाश होळकर, दीपक जाधव, हितेश सिरोया, किरण मोरे, किरण शिंदे, कुणाल उपाध्याय, लक्ष्मी एर्रमासू, मंगेश थोरात, मृणालिनी प्रसाद, प्रदीप राऊत, प्रज्ञा इंगळे, प्रशांत भावसार, पुष्पा मिश्रा, साधना सिंग, सागर शाह, संदीप पनवर, संदीप पाटील,श्वेता खेराज,स्मिता थोरात, श्रीकांत नुला, तुषार राऊत, वैभव नेहे, विजय बनसोड ह्या धावपटूंनी ह्या रनर्स रेस मध्ये सहभाग नोंदविला. धावपटूंना मदत करण्यासाठी ६ सपोर्ट कार मार्गावर तैनात होत्या. रिले रेसचे नियोजन आणि मार्गदर्शन स्पोर्टीफाय टीमचे मुख्य प्रशिक्षक विजय बनसोड यांनी केले होते. या रन मधला सर्वात महत्वाचा टप्पा होता दिवे घाट,कारण हया ४ किलोमीटर च्या अंतरामधे ३०० मीटर चा चढ आहे. जिथे चालताना दमछाक होते तिथे पळायचे होते. जेजुरी मध्ये वंदेमातरम संघटनेतर्फे सर्व धावपटूंचे स्वागत करण्यात आले व सत्कार करण्यात आला.

स्पोर्टिफ़ाय ची स्थापना २०१७ मधे पुण्यातील धानोरी येथे रनिंग व फिटनेस बद्दल जनजागृती करण्यासाठी झाली. ग्रुपने गेल्या ५ वर्षामधे धानोरी,लोहगाव,विश्रांतवाडी, टिंगरे नगर परिसरातील शेकडो लोकांना धावण्याचे शास्त्र शुद्ध प्रशिक्षण मोफत दिले आहे.तसेच ग्रुप तर्फे वर्षभर वेगवेगळे क्रीडात्मक कार्यक्रम घेतले जातात व फिटनेस मनोरंजक होईल याकडे लक्ष दिले जाते.



# मनपा शाळेत वाचन प्रेरणा दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन7 सिडको औरंगाबाद या शाळेत भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ थोरे सर व केंद्रीय मुख्याध्यापिका मा. श्रीमती संगिता ताजवे मॅडम यांच्या मार्गदर्शनानुसार आजच्या सर्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रश्नमंजुषा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करून प्रथम व व्दितीय क्रमांक काढण्यात आले. बक्षीस वितरण करण्यात आले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्राची घुसळे (९वी) प्रथम क्रमांक, तन्वी महाजन (7वी) द्वितीय क्रमांक, वक्तृत्व स्पर्धेत दीक्षा पगारे(8वी) प्रथम क्रमांक, सतीश खंडागळे (7वी)द्वितीय क्रमांक या विद्यार्थ्यांनी बक्षिसे पटकावली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीमती सुनन्दा आरदवाड मॅडम यांनी भूषवले. परीक्षक म्हणून श्रीमती मंगला महाजन, श्रीमती दीपाली औटे यांनी स्थान स्वीकारले. दीपक पडोळ, श्रीमती दीपाली औटे, वेंकट जाधव या शिक्षकांनी प्रेरक मार्गदर्शन केले. श्रीमती मंजुश्री राठोड, श्रीमती वैशाली देशमुख, श्रीमती शुभांगी चव्हाण, श्रीमती नेहा पोळ यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साहाय्य केले. श्रीमती अंजली कुलकर्णी मॅडम यांनी जागतिक हात धुवा दिनाबद्दल शास्त्रीय माहिती सांगितली. सूत्र संचलन मनोज अग्रवाल यांनी केले. वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला.



# क्रीडांगण स्पोर्ट्स हब येथे 18 वर्षीय औरंगाबाद विभाग संघाचे 1 दिवसीय सराव प्रशिक्षण शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** क्रीडांगण स्पोर्ट्स हब येथे 18 वर्षीय औरंगाबाद विभाग संघाचे 1 दिवसीय सराव प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. वरोरा चंद्रपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय 18 वर्ष खालील मुले व मुली यांच्या स्पर्धा करीत सहभागी होणारा औरंगाबाद विभाग संघचे सराव प्रशिक्षण शिबिर हे व्ही. एल. सी. व्हॉलीबॉल अकेदमी क्रीडांगण स्पोर्ट्स हब येथे पार पडले सदरील प्रशिक्षण शिबिर हे लोकेश ठाकरे सर व अभिषेक गणोरकर सर यांनी घेतले व क्रीडांगण स्पोर्ट्स हब व व्हीं एल सी व्हॉलीबॉल अकेदमी चे सर्व सीनिअर खेळाडू तसेच डॉ. आबासाहेब शिरसाठ विभागीय सचिव औरंगाबाद विभाग लोकेश ठाकरे अभिषेक गणोरकर करण खोमणे, प्रमोद महाजन आदींनी स्पर्धासाठी शुभेछा दिल्या.

# माझी जे चौकशी करतील त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याची माझी तयारी : अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मी एक या देशाचा नागरिक आहे. मी संविधान, कायदा मानणारा आहे त्यामुळे माझी जे कुणी चौकशी करतील त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याची माझी तयारी आहे अशी स्पष्ट भूमिका राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत मांडली. पुन्हा एकदा तुमची चौकशी होणार असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता अजित



पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. हे प्रकरण २०१२ पासूनचे आहे. प्रत्येकवेळी अजित पवारांचे नांव येते. अजित पवार आणि ७५ लोक मात्र त्या ७५ लोकांची नांवे येत नाही फक्त अजित पवार यांचे नाव, फोटो, हेडलाईन होते. मात्र त्यांचे सरकार आहे काय चौकशी करायची ती करा असेही अजित पवार यांनी स्पष्ट शब्दात सांगितले. माझी चौकशी सहकार विभागामार्फत, निवृत्त न्यायाधीशांमार्फत, सीआयडी, एसीबी आणि आर्थिक गुन्हा अन्वेषण विभागाने केली मात्र आता आर्थिक गुन्हा अन्वेषण विभाग चौकशी करणार अशी पुन्हा बातमी कानावर आली आणि तुमच्या माध्यमातून वाचली, पाहिली परंतु याबाबत मला माहिती नाही असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.

# स्व. आप्पासो. आ.ध. देवरे यांच्या दहाव्या पुण्यतिथी स्मरणार्थ देवरे विद्यालयात मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**विखरण :** श्री.आप्पासो. आत्माराम धवळू देवरे माध्यमिक विद्यालय विखरण विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष, स्व. आत्माराम धवळू देवरे यांच्या दहाव्या पुण्यतिथी निमित्त सन २०२१-२२ मधील इ.१०वी वर्गातील प्रथम तीन विद्यार्थी, उच्च प्राथमिक (५वी), पूर्व माध्यमिक (८वी), एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षा पात्र व तत्सम परीक्षांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, पालक-शिक्षक-विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन विखरण गावातील प्रथम नागरिक सरपंच, छाया बापु पाटील, व्याख्याते किशोर निकम, कर सहाय्यक, नंदुरबार यांनी केले. अध्यक्ष स्थानी संस्थेचे राजेंद्र देवरे निवृत्त डी.सी. रा.प.मंडळ जळगाव विभाग, तसेच प्रमुख अतिथी म्हसदी येथील जेष्ठ नागरिक गंगाराम सुकलाल देवरे ,सादिक शाह, प्रकाश वेडू देवरे, म्हसदी ग्रा.पं. सदस्य विष्णू गायकवाड, प्यारेलाल पिंजारी, सुनील पवार, रत्नाकर बागुल, जेष्ठ नागरिक एस.एन. देवरे, दगाजी देवरे, अविनाश देवरे, विजय



विसपुते, सुभाष देवरे, रहेमान पिंजारी, यशवंत सोनवणे, उमेश देवरे, चंद्रकांत माळचे, डेगाव येथील आदर्श शेतकरी सुभाष अकलाडे, गोपाल अकलाडे, बोराळा येथील सरपंच तुंबा पुना पाटील, नाशिंदा येथील सरपंच प्रतिनिधी अरुण अभिमन पाटील, विखरण गावातील उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य तसेच आदर्श शेतकरी ईश्वर पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक व अहवाल वाचन विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.डी. साळुंके यांनी केले. भाग्यश्री पाटील हिने मराठी भाषेतून, नेहा पाटील हिने इंग्रजीतून भाविन बोरसे याने हिंदी भाषेतून तसेच तेजस पाटील याने अहिराणी भाषेतून आप्पासाहेबांचे जीवनचरित्र व विद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती आपल्या मनोगतातून व्यक्त केल्यात.

यशस्वितांच्या पालकांनी मार्गदर्शक शिक्षक, मुख्याध्यापकांचे मानवस्त्र व श्रीफळ देऊन सन्मान केला. पालकांच्या मनोगतानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा आपल्या पालकांसमवेत प्रमुख मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह,प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आले.

तसेच 'स्व. आप्पासाहेबांचे जीवनकार्य व व्यक्तिमत्त्व विकास'या विषयावर किशोर निकम यांनी आपल्या व्याख्यानातून आप्पासो. यांनी आपल्या आयुष्यातील खडतर प्रवासातून यशस्वी वाटचालीचा जीवनपट सादर केला अध्यक्षीय भाषणात राजेंद्र देवरे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आलेख गुणवत्ता पूर्ण शिक्षणातून अधिक उंचावेल अशी भावना व्यक्त केली कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डी. बी. भारती यांनी तर आभार वाय. डी बागुल यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी विद्यालयाचे, के.पी. देवरे, एम.डी. नेरकर, व्ही.बी. अहिरे, एस. एच. गायकवाड, आर.एम. पाटील, डी.बी. पाटील, एम.आर.भामरे, एस.जी. पाटील तसेच विद्यालयाचे माजी विद्यार्थी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.



# पैसे दुप्पट करून देण्याचे आमिष; साडेसत्तावीस लाखांना लावला चुना

## कन्नड तालुक्यातील घटना: गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** अनेकांना वाटते कमि कलावधित जास्त व्याज मिळावा आणि आपले पैसे प पन सुरक्षित असावे मात्र कन्नड तालुक्यात तर वेगळेच चित्र पहावयास मिळत आहे मागील काहि महिन्यात 30-30 या प्रवेट योजनेने कन्नड़ तालुक्यासह ग्रामीण भाग चांगलाच पिलून काढला होता, या योजने मध्ये अक्षशा लोकांनी आपली जमीनी विकुन पैसे गुंतवले होते, तेही अश्याच लालची पोटी, काहि दिवस चांगला भरसाठ व्याज द्याचा आणि संबंधिताची शेवट-शेवट रक्कमच गायब होत असल्याने परिसरात एकच तराम्बळ उड़त होती. जास्त व्याजदराच्या लालची पोटी अनेकांचे घर उध्वस्त झाले आहे, शेअर मार्केट मध्ये व्याज दर उत्कृष्ट प्रकारे मिळते ही बाब सत्य आहे, मात्र त्यात रिस्क पन आहे, तसेच अनेकांनी त्र शेअर मार्केट च्या नावाखाली नागरिकांना लूटन्याचे धंद्याचा श्रोतच बनवून घेतले आहे,याचा अजुन एक भाग पहावयास मिळाला आहे या बाबतीत सविस्तर माहिती अशी आहे की, मार्केटमध्ये गुंतवलेली रक्कम दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवून २७ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या चार जणांविरुध्द कन्नड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आल्याची माहिती समोरा येत आहे.




यातील प्रवीण कैलास देवकर केवट, कैलास देवकर केवट, अनिताबाई कैलास केवट व दीपाली सोमीनाथ केवट, (सर्व रा . शरद पवार कॉलनी, कन्नड ह.मु. जैतापूर, ता. कन्नड) हे व फिर्यादी राहुल बाजीराव राठोड (२८ , रा शरद पवार कॉलनी, कन्नड) हे शेजारी राहत होते . एकमेकांचा परिचय झाल्यानंतर वरील चार जणांनी आम्ही शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करून पैसे दुप्पट करून देत असतो. तुम्हाला इच्छा असेल तर गुंतवणूक करा, असे राहुल यांना आमिष दाखवले. सुरुवातीला म्हणजे ५ ऑक्टोबर २०१९ पासून छोट्या रकमेच्या मोबदल्यात जास्त रक्कम परत केल्याने राहुल यांचा संबंधितावर पक्का विश्वास बसला. पाच ते सहा महिने असा व्यवहार चालल्यानंतर राहुलकडून टप्प्याटप्प्याने ५ लाख ४५ हजार ८७४ रुपये घेतले. कुणास ही कोणती ही माहिती न देता १० डिसेंबर २०२१ रोजी रात्रीतून ते निघून गेले. घडलेल्या प्रकाराबाबत राहुल यांनी मित्रांबरोबर चर्चा केली असता कैलास देवकर याने प्रवीण उर्फ बिनू राठोड (रा . गजानन कॉलनी, कन्नड) यांच्याकडून १६ लाख रुपये , विशाल मधुकर तांदळे (रा. शिवनगर, कन्नड) यांच्याकडून २ लाख रुपये, युवराज राठोड (रा. हिवरखेडा रोड, कन्नड) यांच्याकडून अडीच लाख रुपये व अजिंक्य मोगल वाघ (रा. दत्त कॉलनी कन्नड) यांच्याकडून एक लाख रुपये शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करतो असे सांगून घेतले, अशी फिर्याद राहुल राठोड यांनी दिल्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि दिनेश जाधव करीत आहे.



# दिवाळीपूर्व गरिबांना धान्याचा लाभ मिळावा

## आमदार फारुख शाह यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शासनाकडून रेशनकार्ड धारकांना शंभर रुपयात दिवाळीचे अन्न,धान्य देण्याचे ठरले असून धुळे जिल्ह्यातील व शहरातील रेशनकार्ड धारकांना दिवाळी ३ दिवसांवर येवुन सुद्धा अजूनपर्यंत धान्य वाटप झालेले नाही. तसेच शहरातील अनेक रेशन दुकानात शासनाच्या नियमाप्रमाणे महिन्यातून २ वेळेस अन्न,धान्याचा लाभ मिळावा असे नियम असताना सुद्धा शहर वासियांना फक्त महिन्यातून एकाच वेळेचे धान्य मिळालेले आहे. तर काही ठिकाणी अजूनपर्यंत गरीब रेशनकार्ड धारकांना धान्याचा पुरवठा झालेला नाही. तरी पुरवठा अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी याची दखल घेवुन तात्काळ दिवाळीपूर्व जिल्हा वासियांना व शहर वासियांना धान्याचा पुरवठा करावा तसेच समाज कल्याण मार्फत मिळणाऱ्या दिव्यांग व वृद्ध नागरिकांना संजय गांधीच्या अनुदानाचा लाभ दिवाळीपूर्व मिळावा कारण शहरातील संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या वृद्ध व दिव्यांग लाभार्थ्यांना ३ महिन्यापासून लाभ मिळालेला नाही. तरी याची दखल घेवून त्यांना तात्काळ लाभ मिळण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी आमदार फारुख शाह यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेली आहे.

# खरीप, रब्बी पिके वाया गेली असून सरकारने ओला दुष्काळ आणि तातडीची मदत करावी : अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** महाराष्ट्रात पावसाने शेतकऱ्यांचे खरीप व रब्बी ही दोन्ही पिके वाया गेली असून सरकारने ओला दुष्काळ जाहीर करतानाच आपला शेतकरीराजा कसा उभा राहिल यासाठी तातडीची मदत जाहीर करावी अशी मागणी राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आज पत्रकार परिषदेत केली. राज्यात परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. पुणे तर जलमय करुन टाकले आहे. तर दुसरीकडे पुन्हा एका चक्रीवादळाचे संकट उभे ठाकले आहे. त्यामुळे जनतेला अलर्ट केले पाहिजे. शिवाय धरणाचे पाणी सोडत असताना नदीकाठच्या लोकांनाही सतर्क केले पाहिजे आणि या घटनांकडे सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणीही अजित पवार यांनी केली.

राज्यात पावसाने हाहाकार माजवला आहे त्यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी यासाठी उद्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची वेळ मागितली आहे. त्यांच्याकडे हे विषय मांडणार आहे असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. मागील महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते त्या शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करतो असे सरकारने सांगितले होते मात्र अद्याप पैसे जमा केलेले नाही असे शेतकरी सांगत आहेत अशी दयनीय अवस्था राज्यातील शेतकऱ्यांची झाली आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी तातडीने लक्ष द्यावे असेही अजित पवार म्हणाले. पावसामुळे रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे आणि शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. काही लोकांच्या घरात पाणी भरले आहे त्यांना तात्काळ धान्याची मदत द्यावी. राज्यसरकारमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना तसे आदेश देण्यात आले तरच लोकांना दिलासा मिळेल असेही अजित पवार म्हणाले. पुण्याला नद्यांचे स्वरूप आले आहे. वाहतूकीबाबत कुणाचे लक्ष नाही. वाहतूककोंडीबाबत पोलिसांना विश्वासात घेण्याची गरज आहे. पुण्याला पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे. याकडे लक्ष द्यायला हवे ते लक्ष दिले जात नाही असा आरोपही अजित पवार यांनी केला. राज्यातील जनतेची शंभर रुपयात दिवाळी गोड करणार असे सरकारमार्फत जाहीर करण्यात आले होते त्यासाठी एका कंपनीला काही कोटीचे कंत्राट दिले आहे मात्र अद्याप जनतेपर्यंत शिधा पोचलेला नाही. पारदर्शकपणे व माफक दरात लोकांना हा शिधा मिळावा अशी अपेक्षा आहे मात्र यात काहीतरी गौडबंगाल आहे असेही बोलले जात असल्याचे अजित पवार म्हणाले. राज्यात बेरोजगारी, महागाई वाढली आहे. नुसती भरती होणार आहे अशा घोषणा सरकार करत आहेत. तरुण याकडे डोळे लावून आहेत. शाळा बंद करण्याचा घाट घातला जात आहे याबाबत सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी अशी मागणीही अजित पवार यांनी केली.

# तिसऱ्या वऱ्हाड लोककला संमेलन अध्यक्षपदी डॉ. चंदनशिवे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अकोला येथे दि. 23 नोव्हेंबर 2022 रोजी संपन्न होणाऱ्या



तिसऱ्या वऱ्हाड लोककला संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध लोककलावंत आणि मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल डॉ. गणेश चंदनशिवे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. डॉ. गणेश चंदनशिवे महाराष्ट्रातील लोककलावंत आणि लोककलांच्या चळवळीतील एक अग्रेसर नाव आहे. मुंबई विद्यापीठात लोककला अकादमीचे प्रमुख आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक आहे. लोककलांचे विद्यार्थी घडविण्यात डॉ. गणेश चंदनशिवे यांचा पुढाकार आणि ध्यास सर्वश्रुत आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई प्रस्तुत वऱ्हाड शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक बहुद्देशीय संस्था लोणी मराठी विभाग शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. 23 नोव्हेंबर 2022 रोजी तिसरे राज्यस्तरीय वऱ्हाड लोककला संमेलन अध्यक्षपदी डॉ. गणेश चंदनशिवे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर हा मुंबई विद्यापीठाचा बहुमान असल्याची प्रतिक्रिया डॉ. गणेश चंदनशिवे यांनी दिली.
या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# यशस्वी उद्योजक होण्यासाठी वेळेचे नियोजन हवे : विवेक गोळे

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** व्यवसाय क्षेत्राकडे केवळ आवड म्हणून न पाहता, जबाबदारी घेऊन काम करणे अतिशय महत्त्वाचे आहे. यशस्वी उद्योजक होण्यासाठी व्यवसायाचा ध्यास, वेळेचे नियोजन, कठोर परिश्रमाची आवश्यकता आहे. सारासार विचार करून आपल्या व्यवसायाची निवड करावी," असे मत ज्येष्ठ उद्योजक व भाग्यश्री टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विवेक गोळे यांनी व्यक्त केले. मराठवाडा मित्र मंडळाच्या कनिष्ठ महाविद्यालयात व्होकेशनल विंग आयोजित 'यशस्वी उद्योजकाशी संवाद' कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गोरे बोलत होते. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष भाऊसाहेब जाधव, प्राचार्य प्रा. देविदास गोल्हार, उपप्राचार्य रमेश पंडित, पर्यवेक्षक आर. व्ही. खजुरे, प्रा. अनिल भोसले, प्रा. राकेश ठिगळे आदी उपस्थित होते. विवेक गोळे म्हणाले, महाराष्ट्राला निसर्गाने अथांग समुद्र किनारा दिलेला आहे. तेथे पर्यटन व्यवसायाला खूप संधी आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर तुम्ही पर्यटन व्यवसाय करू शकता. ग्राहकांना उत्तम सोयी दिल्या, तर भविष्यात पर्यटन व्यवसायाला चांगले दिवस येणार आहेत. काही देश हे फक्त पर्यटन उद्योगावर अवलंबून आहेत. व्यवसायाला बदलत्या तंत्रज्ञानाची जोड देणे गरजेचे आहे. प्रा. देविदास गोल्हार म्हणाले, व्यावसायिक अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजक होण्याची इच्छा निर्माण होते. गेल्या तीन दशकांहून अधिक काळात व्होकेशनल विभागाने हजारो उद्योजक निर्माण केले आहेत व ते आज यशस्वीपणे उद्योग सांभाळत आहेत. महाविद्यालयातील हॉस्पिटॅलिटी व टुरिझम मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम पूर्ण करून यशस्वी उद्योजक झालेल्या अनेक विद्यार्थ्यांचा सत्कार गोळे यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. कुंदन पवार, प्रा. सुनिल पवार यांनी केले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# नव्या पुण्याच्या शिल्पकारांनी केलेला विकास पुण्याच्या रस्त्यावरून वाहतोय

## माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांचा देवेंद्र फडणवीस यांना टोला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** 'नव्या पुण्याच्या शिल्पकारांनी' पाच वर्ष पुण्याचा केलेला विकास पुण्याच्या रस्त्यावरून वाहत आहे अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावला आहे. पुण्यासारख्या जागतिक पातळीवर महत्वाच्या असणाऱ्या शहरात असे चित्र निर्माण होणे हे अत्यंत दुर्दैवी आहे असेही जयंत पाटील यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे. पुणे शहरात अक्षरशः रस्त्यांच्या नद्या बनलेल्या आहेत. गेली २४ तास नागरिकांना प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. गेली पाच वर्ष पुणे महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाची सत्ता आहे, असेही ट्विटमध्ये जयंत पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

# सोयाबीन काढण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांवर कोसळली वीज

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** हिमायतनगर शहरासह तालुक्यात आज दिनांक 18 ऑक्टोबर रोजी दुपारी दोन वाजेच्या दरम्यान वादळी वाऱ्यासह तुफान पाऊस झाला. सिबदरा येथील शेत शिवारात सोयाबीन काढणीसाठी गेलेल्या दोन शेतकऱ्यावर वीज कोसळली. त्यात वारगटाकळी येथील शेतकरी सुनील साहेबराव वायकोळे (वय 34 ) हे सोयाबीन काढणीसाठी सिबदरा येथे होते. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पाऊसात शेतातील सोयाबीन वर फारी झाकण्यासाठी धावपळ करत असलेल्या दोन शेतकऱ्यावर वीज कोसळली. त्यात एक जणाचा जागीच मृत्यू झाला तर दुसरा गजानन टोकलवाड हा गंभीर जखमी झाला असल्याचे घटनास्थळी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांनी सांगितले.



ऐन दिवाळीच्या तोंडावरवरून राजाने पाऊसाची हजेरी लावल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेल्या सोयाबीन पिकांचे अतोनात नुकसान झाले असल्याचे पहायला मिळत आहे. त्यात गेल्या तीन दिवसांपासून तालुक्यातील अनेक भागात जोरदार पाऊस पडत आहे. त्यामुळे शेतकरी बांधव जरा जरी उघाड पडली तर आपल्या शेतात जाऊन आपल्या कुटुंबाची दिवाळी चागली होईल ह्या विवंनचनेने आपल्या शेतात सोयाबीन काढणीसाठी लगबग करत असल्याचे सध्या पहायला मिळत होते. त्यातच आज दि. 18 ऑक्टोंबर रोजी दुपारी शेतात काम करत असताना अचानक मेघ गर्जना होऊन जोरदार पाऊस सुरू झाला. वारगटाकळी येथील शेतकरी सिबदरा परीसरातील शेतकऱ्याच्या शेतात हारवेस्टरने सोयाबीन काढणीची लगबग करीत असताना सोयाबीनवर फारी झाकण्यासाठी गेलेल्या दोन शेतकऱ्यावर दिनांक 18 ऑक्टोबर रोजी दुपारी तीन अचानक वीज कोसळून त्यात सुनील साहेबराव वायकोळे वय 34 हा शेतकरी मरण पावला आहे. तर गजानन टोकलवाड हा गंभीर जखमी झाला असल्याचे घटनास्थळी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले त्यामुळे या घटनेत मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ शासनानेआर्थिक मदत द्यावी, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# राजकीय पुढाऱ्यांच्या दबावाखाली त्यांच्या सोईनुसार यादीत हेराफेरी केली

## जि.प. सदस्य सय्यद कलीम पटेल, शिवसेना विभाग प्रमुख मंगेश जाधव यांची तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** करोडी येथील मतदार यादीमध्ये घोळ अथवा हेराफेरी केल्याप्रकरणी तहसील कार्यालय येथे आक्षेप नोंदवून योग्य अधिकारी यांनी यादीची फेरतपासणी करून यादी नव्याने प्रसिद्ध करावी आणि संबंधित अधिकारी ज्यांनी राजकीय पुढाऱ्यांच्या दबावाखाली त्यांच्या सोईनुसार यादीत हेरा फेरी केली आहे. त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्य सय्यद कलीम पटेल आणि शिवसेना विभाग प्रमुख मंगेश जाधव यांनी केली. मागणीमध्ये माऊली गोल्हार, रामनाथ पा. नवले, गंगाधर परहाड, सुभाष सोनवणे, कार्तिक जाधव, अमोल जाधव, ऋषिकेश जाधव यांनी केली.

# भीमराव परघरमोल लिखित विचार प्रवाह या पुस्तकाचे विमोचन

आधुनिक केसरी न्यूज



**तेल्हारा :** तेल्हारा, जि. अकोला येथील शिवनगर मध्ये विचार मंथन सोहळा घेऊन भिमराव परघरमोल (लेखक, व्याख्याता तथा अभ्यासक फुले शाहू आंबेडकरी विचारधारा) यांच्या 'विचार प्रवाह' पुस्तकाचे विमोचन (प्रकाशन) करण्यात आले. सविस्तर वृत्त असे की, गेल्या पाच वर्षांपासून भिमराव परघरमोल यांच्याकडे बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथपठनाची परंपरा आहे. त्या उपक्रमामध्ये शहरातील विविध जाती धर्माचे लोक सहभागी होत असतात. तसेच यावर्षी त्यांच्या नवनिर्मित घराचा (मूलनिवासी सदन) गृहप्रवेश व स्वलिखित पुस्तकाचे विमोचन असा त्रिवेणी संगम घडवण्यासाठी त्यांनी विचार मंथन सोहळ्याचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाऊ भोजने (ज्येष्ठ पत्रकार तथा साहित्यिक, वरवट बकाल) तर प्रमुख पाहुणे म्हणून, भाई बाबुराव सरदार (भूमी मुक्ती मोर्चा आंदोलन, जलंब जिल्हा बुलढाणा) जीवन गावंडे (संपादक तथा निवेदक MNT न्यूज नेटवर्क नागपूर) धनंजय झाकर्डे (चेअरमन बामसेफ़ पब्लिकेशन विंग नई दिल्ली) दिलीप फोकमारे गजल गायक, लक्ष्मणराव तिव्हाणे (कुणबी समाज नेते कळमखेड) यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भदंत विनयपाल व मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून उपस्थिताना भंतेजींनी धम्मदेशना दिली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विचार प्रवाह या पुस्तकाचे विमोचन करून, लेखकाला त्यावर विचार व्यक्त करण्यासाठी प्राचारण केले. उपस्थित मान्यवरांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म,भारतीय संविधान तथा विचार प्रवाह यातील तत्त्वज्ञानावर आपापले विचार मांडले कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेश नृपनारायण यांनी केले तर आपल्या उत्कृष्ट शैलीतील संचालन डॉ. सरवदे यांनी करून आभार वैभव परघरमोल यांनी मानले. कार्यक्रमाला शहरासह परिसरातील अनेक प्रतिष्ठित तथा फुले शाहू आंबेडकरी विचारधारा प्रेमी लोकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीधरराव भगवार, गोपाल खोपले, विनोद आढाव, गौतम वानखडे, महादेव धुरंदर, विनोद वानखड़े, सिद्धार्थ बोदडे, देऊळकर, मिलिंद बोदडे मोहित भिलंगे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



# एक वाटा आईचा! शासकीय आश्रम शाळा ब्राम्हणीचा नाविन्यपूर्ण उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील शासकीय माध्यमिक आश्रम शाळा ब्राम्हणी (गराडा) कन्नड येथील एक वाटा आईचाया उपक्रमांतर्गत शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांस लाडु, चिवडा,शंकरपाळे दिवाळी फराळ पॉकेट तयार करून देण्यात आले. दिवाळी सुट्टया असल्याने प्रथमसत्र नंतर अखेरच्या दिवशी विद्यार्थ्यांना एक वाटा आईचा या उपक्रमांतर्गत फराळ पाकीट सोबत देण्यात आले. प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवसी विभाग औरंगाबाद देवकन्या बोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्याम जाधव होते, तर प्रमुख पाहुणे गराडा गावचे सरपंच भरतसिंग राठोड, प्रतिष्ठीत नागरीक अशोक चव्हाण होते. कार्यक्रमासाठी शाळेचे सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थीत होते. सूत्रसंचालन धम्मपाल सोनकांबळे यांनी केले. नितीन सोळुंके, विशाल मोरे, विशाल गोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणादिवस म्हणुन साजरा करण्यात आला. प्रतिकुल परिस्थिती असून देखील कलाम ह्यांनी अभ्यास व जिद्दीच्या जोरावर सर्वोच्य पदे भुषविली व आजही त्यांची अढळ प्रतिमा जनसामान्यांच्या ह्रदयात आहे. या आषयाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात हे दोन्ही कार्यक्रम पार पडले कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शासकीय आश्रम शाळा ब्राम्हणी येथील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# वाहनधारकांवर पोलिसांची करडी नजर

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** पोलिस ठाणे हद्दीतून वाहतुकीचे नियम पायदळी तुडवणाऱ्या वाहनधारकांवर सोयगाव पोलीस ठाण्याचे ठाणे प्रमुख सहाय्यक पोलिस निरीक्षक अनमोल केदार यांनी कारवाईचा बडगा उगारला असल्यामुळे वाहतुकीचे नियम पायदळी तुडवून सुसाट धावणाऱ्या वाहनधारकांमध्ये खळबळ उडाली आहे. सोयगाव पोलीस ठाणे हद्दीतील जाणाऱ्या वाहनांची बारकाईने तपासणी, वाहनधारकांचे लायसन्स, कागदपत्रे, वाहनांमध्ये काय आहे, याची तपासणी सपोनि केदार हे पोलीस कर्मचाऱ्यांसमावेत करत असल्याचे पाहण्यास मिळत आहे. सोयगाव पोलीस ठाणे हद्दीतून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनधारकांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन देखील सपोनि अनमोल केदार, उपनिरीक्षक सतीश पंडित व पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर सरताळे यांनी केले आहे.

# कै. बाबुरावजी उर्फ आप्पासाहेब काळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शेतकरी संवाद मेळावा

## शेतकरी बंधू, शेती प्रेमी व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे प्रा. जीवन कोलते यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथील अजिंठा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी, माजी मंत्री कै. बाबुरावजी उर्फ आप्पासाहेब काळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक १८/१०/२२ रोजी सकाळी अकरा वाजता संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्यावतीने "भव्य शेतकरी संवाद मेळाव्याचे" आयोजन करण्यात आले आहे. या संवाद मेळावाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पंजाबराव डख उपस्थित राहणार आहे. या सुवर्ण संधीचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्रा.जीवन कोलते यांनी केले आहे. मेळाव्याचे उदघाटन प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष औरंगाबाद रंगनाथनाना काळे अभ्यास शिक्षण संस्था हे मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी असणार आहे. तर तुळशीरामचंद पाटील (वन शेती पुरस्कर्ते) व डॉ. भालचंद्र वायकर (अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून अजिंठा शिक्षण संस्थेचे सचिव मा प्रकाशदादा काळे व प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांची उपस्थित असणार आहे.

शेतकरी संवाद मेळावा यशस्वी व्हावा यासाठी प्राचार्य डॉ. राजेश यादव, उपप्राचार्य डॉ शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे, कनिष्ठ विभागप्रमुख डॉ. उल्हास पाटील, पदव्युत्तर समन्वयक डॉ. छत्रघन भोरे, संयोजन समिती प्रमुख डॉ भाऊसाहेब गाडेकर, डॉ. पंकज शिंदे, डॉ. सैराज तडवी, प्रा. अनिल मानकर, प्रा. रवी जाधव, डॉ गणेश मिसाळ यांच्यासह संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उपस्थित राहणार आहे. तरी सोयगाव तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने शेतकरी संवाद मेळावाला उपस्थित राहावे असे आवाहन प्रा. जीवन कोलते यांनी केले आहे.

# भाजपाचा मोठेपणा, शिवसेनेचा कोतेपणा व्यक्तीपेक्षा पक्ष श्रेष्ठ, मुरजी पटेल यांनी दाखवले



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**अंधेरी पोटनिवडणुकीच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या राजकारणात दोन चांगल्या गोष्टी विशेषत: भाजपाच्या संस्कृतीमध्ये दिसुन आल्या. ऐनवेळी भाजपाने उमेदवारी मागे घेवून मनाचा मोठेपणा दाखवला. अगदीच राज ठाकरेपासुन शरद पवारांच्या विनंतीला सन्मान देत एवढेच नव्हे तर पाठीमागून ज्यांनी विनंती केली त्यांचाही सन्मान राखत आपल्या मनाचा मोठेपणा तोही उमेदवार विजयाच्या उंबरठ्यावर असताना भाजपाने दाखवुन देणं तो सुसंस्कृत राजकारणाचा भाग म्हणावा. दुसऱ्या बाजुने मैदानात उतरलेला बॅटसमन कर्णधाराने परत बोलावला आणि तो सन्मानाने आदेशाचे पालन करत कॅबीनमध्ये आला. याचाच अर्थ भाजपात व्यक्तीपेक्षा पक्ष श्रेष्ठ हे पुन्हा एकदा सिद्ध झालं. मुरजी पटेलनं माझी आई पक्ष आणि नेतृत्व आहे तिथून ते परतले आणि पक्ष कार्यालयात आले. असं चित्र केवळ भाजपामध्येच दिसुन येतं. त्याहून अधिक शिवसेनेच्या अंगी कशा प्रकारचा कोतेपणा? तेही जनतेने पाहिलं. कारण भाजपाच्या भुमिकेचे स्वागत करण्यापेक्षा मदतीचा हात देणाऱ्यावरही टिका करणं त्यालाच आकडुजीराव असं म्हणतात. पेडणेकर ताई असो किंवा अंधारे ताई असो. यांच्या आलेल्या प्रतिक्रिया मातोश्रीतला कोतेपणा दाखवणाऱ्या नक्कीच वाटल्या.**

अंधेरी पोटनिवडणूक जयश्री लटके विरूद्ध मुरजी पटेल अशी लढत होती. वास्तविक मुनिर पटेल मागच्या वेळी अपक्ष लढूनसुद्धा 45000 मते त्यांना मिळाली होती आणि शिवसेनेचे लटके दहा ते बारा हजारांनी विजयी झाले. या निवडणुकीत भाजपची अधिकृत उमेदवारी त्यांना मिळाली होती. त्यांची लोकप्रियता विजयासमिप निश्चित जाणारी होती. शिवाय मुख्यमंत्री शिंदे गट यांचाही प्रभाव फायद्याचा ठरला असता. लटके निवडूनच येतील अशी 100 टक्के राजकिय परिस्थिती नव्हती. भाजपाने निवडणुकीत उमेदवार उतरविला होता. दुसरीकडे शिवसेनेच्या उमेदवार लटके यांचं राजीनामा प्रकरण असेल किंवा न्यायालयीन लढाई असेल यात बरेच दिवस वाद झाला. एक गोष्ट निश्चित आहे राजकारण शेवटी राजकारण असतं. कदाचित लटके यांच्या उमेदवारीबाबत अगोदर घडामोडी झाल्या नसत्या तर काय सांगावं? शिवसेनेने उमेदवार बदललाही असता. किमान शिंदे- फडणवीस यांच्या भुमिकेमुळे शिवसेनेकडून लटके यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब राजकिय नाविलाजास्तव करावा लागला. नंतरच्या घडामोडी पुर्ण झाल्यानंतर भाजपाकडून मुनिर पटेल यांची उमेदवारी जाहिर झाली. दोघांनी शक्तिप्रदर्शन जोरात केलं. दरम्यानच्या काळात काही घडामोडी घडल्या. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या काही तासा अगोदर मनसे नेते राज ठाकरे यांनी फडणवीसांना पाठवलेले पत्र असेल किंवा राष्ट्रवादीचे संस्थापक शरदचंद्रजी पवार यांनी भाजपाला केलेले आवाहन असेल. त्याहून अधिक भाजप नक्कीच कठोर मनाचा नाही. अनेकदा अशा दुःखद निवडणुक प्रसंगी भाजपाने समर्पक भुमिका घेतली. कै.आर.आर.पाटील, कै.पतंगराव कदम यांच्या विरोधात उमेदवार दिले नव्हते. कदाचित हीच संवेदनशीलता पुन्हा दाखवत राजकिय परिस्थिती पाहून शिवाय राज ठाकरे, पवार साहेब यांच्या विनंतीला मान देवून शेवटच्या क्षणी भाजपाने मुनिर पटेल यांची उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेतला. गंमत बघा, एखाद्या राजकिय पक्षाची संस्कृती आणि सामुहिक निर्णयाची गती किती सुसंस्कृत असते? याचं दर्शन महाराष्ट्राने पाहिलं. जो मुनिर पटेल बॅट घेवून निवडणुकीच्या मैदानात उतरला स्पीचवर जाताच पुन्हा खेळाडूच्या कॅबीनमध्ये येण्याची सुचना आली तोच क्षणात वापस परतला. ही भाजपाची संस्कृती म्हणावी लागेल. एवढेच नाही तर माध्यमांशी बोलताना माझ्यासाठी पक्ष आदेश महत्वाचा आहे. कारण भाजपा ही माझी मातृसंस्था होय. त्यामुळे हे पक्षांतर्गत श्रेष्ठत्व पुन्हा एकदा लोकशाहीचा स्विकार करणाऱ्या भाजपात सिद्ध झालं. अन्यथा इतर पक्षाप्रमाणे कदाचित जाहिर झालेला उमेदवार परत आलाच नसता. पण भाजपात पक्षादेश तथा नेतृत्वाची भुमिका सामुहिकपणे निर्णयक्षमता संस्कृतीचं सिद्धता झाली. वास्तविक पहाता मुनिर पटेल यांचा आदर्श नव्या पिढीतील युवकांनी घ्यायला हवा. शेवटी संघटनेत काम करताना व्यक्तीपेक्षा पक्ष महत्वाचा हे पटेल यांनी दाखवुन दिलं. आदेश मिळताच थेट प्रदेश कार्यालय गाठलं. तिथं आशिष शेलारांनी स्वागतही केलं. या निमित्ताने राजकिय पक्षाची संघटनात्मक शिस्त किती श्रेष्ठ असते? हा अनुभव वर्तमान राजकिय व्यवस्थेत इतरांना निश्चित आदर्श घेण्यासारखाच म्हणावा लागेल. असो. भाजपाने मनाचा मोठेपणा दाखवून उमेदवारी मागे घेतली आणि लटके ताईचा विजयाचा मार्ग मोकळा केला. खरं तर या भुमिकेचं मातोश्रीच्या बाहेर येवून पदसिद्ध जबाबदार लोकांनी स्वागत करायला हवं होतं. पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे पेडणेकर ताई, अंधारे ताई, अरविंद सावंत किंवा अनेकांनी हात आखडता ठेवून मनाचा कोतेपणा दाखवून दिला. शेवटी राजकारणात प्रत्येक पक्षाची आणि नेत्यांची राजकिय संस्कृती जशी असते तशीच कार्यकर्ते अवलंब करत असतात तो भाग वेगळा. काय तर म्हणे भाजपाचा उमेदवार भाजपाला पराभव दिसला. म्हणून उमेदवारी मागे घेतली? असा टाहो शिवसेनेच्या अनेक जबाबदार नेत्यांनी या घडामोडीनंतर फोडला. पण एक निश्चित आहे भाजपा मैदानात उतरविल्यानंतर कधीच खेळाडूला माघारी बोलावत नाही. आजवरच्या इतिहासात कदाचित हे उदाहरण पहिलं असेल. त्याचंही कारण राजकारण शेवटी लोकशाही मार्गाने करताना सन्मानजनक करावं लागतं. पण शिवसेनेसारख्यांच्या हे लक्षात कधी येणार? अगदी जेलात बसल्या ठिकाणीही संजय राऊतांनी राज ठाकरेच्या पत्राचा उल्लेख स्क्रिप्ट भाजपाची असा केला. त्यालाच कोतेपणा असं म्हणावा लागेल. बिचाऱ्या लटके ताईच्या तोंडून तरी किमान आभाराचे चार शब्द बाहेर पडले. राजकारणात शेवटी विरोधकांच्या मनाचा मोठेपणाचं कौतुक करायलाही तेवढा मोठेपणा अंगी असावा लागतो. पण स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या नंतर अगदी कुटुंबियांपर्यंत तो दिसत नाही हेच खऱ्या अर्थाने शिवसेनेच्या वाताहतीचं दुर्दैव म्हणावे लागेल. दुसरीकडे राज ठाकरे यांनी दोन दिवसात दोन पत्र भाजपाला लिहिणं ही खऱ्या अर्थाने राजकिय संस्कृती म्हणावी लागेल. त्यातही राजकारणातल्या दोन भावाचा स्वभाव हा देखील अनुभवास आला. काही संबंध नसताना उमेदवारी मागे घ्यावी ही संवेदना राज ठाकरेंनी दाखवत पहिल्यांदा एक पत्र भाजपाला लिहिलं त्यांचा सन्मान ठेवून भाजपाने देखील उमेदवारी मागे घेतली. तेव्हा राज ठाकरेंनी दुसरं पत्र भाजप नेते अर्थात देवेंद्र फडणवीसांना आभाराचं पाठवलं. हा मनाचा मोठेपणा राजकारणात असावा लागतो. तो मातोश्रीच्या बंगल्यात दिसत नाही. हेच दुर्दैव म्हणावे लागेल आणि तिथे जर मनाचा मोठेपणा असता तर 2019 च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाचा मुख्यमंत्री आणि शिवसेनेचा उपमुख्यमंत्री हे चित्र महाराष्ट्राला पहायला मिळालं असतं. एव्हाना पंचेवीस वर्षाची युती तुटली नसती. एक गोष्ट निश्चित म्हणावी लागेल. महाराष्ट्राच्या वर्तमान राजकिय व्यवस्थेत अंधेरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या निमित्ताने विशेषतः नव्या पिढीतील राजकारण्यासमोर भाजपाने दोन आदर्श दाखवून दिले. व्यक्तीपेक्षा पक्ष श्रेष्ठ आणि कार्यकर्ता पक्षाचा आदेश पालन कसा करतो? हे अगदी मुरजी पटेल यांच्या भुमिकेतून पहायला मिळालं. खरं तर बिचाऱ्या मुनिर पटेल यांचे कौतुक करावे तेवढे कमीच वाटते.

## दिवाळीसाठी दानवे यांच्याकडून विशेष गाड्यांचे नियोजन

### प्रवाशांनी लाभ घ्यावा भाजपा जि. उपध्याक्ष जयप्रकाश चव्हाण यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** दिवाळीचा सन काही आठ दिवसावर येवून ठेपल्याने रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या प्रचंड असते. त्यामुळे रेल्वेमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडून दिवाळीसाठी चार विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, दरम्यानच्या काळातील गर्दी बघता, गाड्यांमध्ये अधिक वाढ करण्यात यावी, अशी मागणी भाजपाचे जिल्हा उपध्याक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री यांच्याकडे केली होती. त्यांची मागणी रेल्वे मंत्री रावसाहेब दानवे यांनी मंजूर करून विशेष गाड्या वाढविण्यात आलेल्या आहेत तरी विशेष गाड्यांचा जास्तच



जास्त प्रवासांनी लाभ घ्यावा असे आवाहन जि.उपध्याक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी केले आहे. दिवाळी उत्सव आठ दिवसावर आहे. कोरोनाच्या दोन वर्षानंतर संपूर्ण देशात दिवाळी मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात येणार. दिवाळीला शाळा, महाविद्यालयाला सुट्ट्या असतात. यामुळे दिवाळीच्या वेळी कामानिमित्त अन्यत्र राहणारे कुटूंब उत्सवासाठी घरी जातात. सुट्ट्यांमध्ये दिवाळीनंतर नातेवाईकांच्या भेटीसाठी, पर्यटनासाठी नागरिक बाहेर पडतात. प्रवासासाठी नागरिकांची प्राथमिकता रेल्वेला असते. यामुळे दरम्यानच्या काळात रेल्वेवर प्रचंड गर्दी वाढते. हिच बाब लक्षात घेऊन 22 ऑक्टोबरपासून दिवाळीसाठी चार विशेष गाड्या सोडण्यात येणार आहे. अमरावती – जबलपुर दरम्यान नुकतेच गाडीला सुरुवात झाली आहे. गाडी क्रमांक 12160 जबलपुर – नागपूर हि गाडी आता अमरावती स्टेशनपर्यंत व गाडी क्रमांक 12159 अमरावती – जबलपूर स्टेशन दरम्यान धावेल. सध्या दुरुस्तीच्या कामासाठी अनेक गाड्या बंद आहेत. त्यामुळे ही गाडी सुरू झाल्यामुळे प्रवाशांना मोठ्या दिलासा आहे. अशी माहिती जि.उपध्याक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी बोलताना दिली.

## भोकरला सहा. पोलिस अधीक्षक शफकत आमना यांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** राज्य सरकाने भारतीय पोलीस सेवेतील ११



अधिका-यांना सहायक पोलिस अधीक्षक पदावर नियुक्तया दिल्या आहेत. यात नांदेड जिल्ह्यातील भोकर उपविभागात महिला आयपीएस अधिकारी शफकत आमना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील गृह विभागाचे सह सचिव व्यंकटेश भट्ट यांनी काढलेल्या आदेशानुसार सन २०१८,२०१९ आणि २०२० या वर्षात भारतीय पोलीस सेवेत दाखल ११ अधिका-यांना सहायक पोलिस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी पदावर पहिल्या नियुक्तया दिल्या आहेत. या नियुक्तीमध्ये नांदेड जिल्ह्यातील भोकर उप विभागात महिला आयपीएस अधिकारी शफकत आमना यांना नियुक्ती मिळाली आहे. यापुर्वी नांदेड जिल्ह्यात निर्मला अर्जुन आणि त्यानंतर विनिता साहू यांनी काम केले आहे. शफकत आमना यांनी भूगोल हा ऐच्छिक विषय घेऊन केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली आहे. तर अन्य अधिका-यांमध्ये तेगबीरसिंघ संधू (२०१८) मालेगाव शहर जि. नासिक,धीराज कुमार बच्चू (२०१९) माजलगाव जि. बीड, अभयसिंह बाळासाहेब भोसले (२०२०), गोकुळ राजजी (२०२०) बाळापूर जि.अकोला, आशित नामदेव कांबळे (२०२०) रामटेक जि.नागपूर ग्रामीण, श्रीमती महेक स्वामी (२०२०) वैजापूर जि. औरंगाबाद, श्रीमती नितीपुडी रश्मिता राव (२०२०) तुमसर जि. भंडारा, पंकज अतुलकर (२०२०) पुसद जि. यवतमाळ, सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी (२०२०) धुळे शहर व एम.वी. सत्यसाई (२०२०) यांना लोणावळा जि.पुणे ग्रामीण येथे नियुक्ती देण्यात आली.

## हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान जाहीर करा : प्रा. जीवन कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सध्या परिस्थिती पाहता गेल्या आठ ते दहा दिवसापासून औरंगाबाद जिल्ह्यामध्ये व सोयगाव तालुक्यात आणि सावळदबारा परिसरात सतत धार पावसाने आहाकार माजवला असून हाता तोंडाशी आलेले पिके मात्र शेतकऱ्यांच्या हातातून जाताना दिसत आहेत शेतामध्ये असलेली सोयाबीन तिच्या मात्र पावसाच्या पाण्यात बुडून अक्षरशा काड्या झाल्या आहेत आणि बोंडाच्या बाहेर फुटलेल्या कापसाच्या वाती झाल्या आहेत अशी परिस्थिती असताना आणि आणखी सतत धार पाऊस आज पर्यंत चालू आहे. मात्र बळीराजा अक्षरशा मेटाकोटीला आला असून त्याच्याकडे मात्र आत्महत्याच्या पलीकडे कुठलाही पर्याय नाही त्यामुळे तात्काळ शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान जाहीर करावे त्यामुळे शेतकऱ्याला गेलेला खर्च तरी निघेल. आज परिस्थिती पाहता शिंदे आणि फडणवीस सरकार हे फक्त औरंगाबाद जिल्ह्यामध्ये शेतकरी बाधित असल्याचे दाखवत आहे. मात्र अतिशय दुःखाचे आणि खेददायी आहे. परंतु यामुळे औरंगाबाद जिल्हातील शेतकरी अक्षरशा त्रस्त झाला आहे. आज परिस्थिती पाहता सोयाबीनच्या काया झाल्या कापसाच्या वाती झाल्या मायबाप सरकार शेतकरी आत्महत्या करायची वाट पाहत आहे काय असा सवाल प्रा.जीवन कोलते( सामाजिक कार्यकर्ते )करत आहे. प्रा.जीवन कोलते यांनी प्रसिद्धी पत्रक दिला आहे पुढे ते म्हणाले की जगावर कुठलेही संकट आले तरी बळीराजा मात्र त्यांना अन्नधान्य पुरवण्याचे काम करतो मात्र त्याच बळीराजावर संकट आले तर मात्र त्यांच्याकडे कानाडोळा केला जातो ही अतिशय मनाला खेद देणारे गोष्ट असून परिस्थिती पाहता गेल्या दहा ते पंधरा दिवसापासून सतत धार सोयगाव तालुक्यात वं सावळदबारा परिसरात औरंगाबाद जिल्ह्यामध्ये अक्षरशा पावसाचा धुमधडाका चालू असून मात्र मायबाप सरकारने औरंगाबाद जिल्ह्यामध्ये अनुदानाची यादी जाहीर करताना त्यामध्ये शेतकरीच नुकसानग्रस्त असल्याचे दाखवले आहे हे मात्र बळीराजाच्या तोंडाला पाणी पुसण्यासारखे आहे त्यामुळे तात्काळ कृषी अधिकारी मंडळ अधिकारी तलाठी यांनी तात्काळ पंचनामे करणे गरजेचे आहे परिस्थिती पाहता शेतकऱ्यांना मात्र आता शेतामध्ये राहिल्या त्या कापसाच्या वाती आणि सोयाबीनची झालेली माती या पलीकडे आता शेतकल्याकडे कुठल्याही पद्धतीचे काही राहिले नसून आता मात्र बळीराजाला शिंदे आणि फडणीक सरकारकडून न्याय मिळेल अपेक्षित आहे त्यामुळे तात्काळ महाराष्ट्र सरकारने औरंगाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पन्नास हजार रुपये हेक्टरी मदत जाहीर करावी अशी मागणी प्रा.जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते) यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केली आहे.

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या राज्य प्रवक्तेपदी डॉ. शिवाजी हुसे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** स्वाभिमानी शेतकरी संघटना ही शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमकपणे लढणारी संघटना आहे. आजपर्यंत मोर्चे, आंदोलनातून संघटनेने अनेक प्रश्न मार्गी लावले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटना ही खा. राजू शेट्टी यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली उत्तमपणे वाटचाल करीत आहे. अनेक युवक, कार्यकर्ते बुद्धिजिवी वर्ग संघटनेत सहभागी होत आहेत. कन्नड येथे दि. १७ ऑक्टोंबर २ ०२२ रोजी संपन्न झालेल्या पहिल्या ऊस परिषदेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी व प्रदेशाध्यक्ष प्रा. संदीप जगताप यांनी डॉ. शिवाजी हुसे यांची राज्य प्रवक्तेपदी निवड केली. यावेळी त्यांचा सत्कारही करण्यात आला. डॉ. हुसे यांनी २०१९ मध्ये राजू शेट्टी यांच्या विचार व कार्यामुळे प्रेरित होऊन शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी संघटनेत प्रवेश केला. मराठवाडा विभाग प्रवक्ते पदाची जबाबदारी त्यांना दिली होती. या कालावधीत डॉ. शिवाजी हुसे यांनी संघटनेची ध्येय, धोरणे, विविध आंदोलने, मोर्चे, मेळावे, बैठका तसेच राज्यकार्यकारिणी बैठकीत



सक्रिय सहभाग घेऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. शासन दरबारी अनेक निवेदने दिली. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यपातळीवर काम करण्याची संधी दिली आहे. डॉ. हुसे हे कवी, लेखक, संपादक असून उत्तम वक्तेही आहेत. सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीचे ते संस्थापक अध्यक्ष असून नदी पुनरुज्जीवनाचे काम त्यांनी हाती घेतले आहें. यावेळी तालुक्यातुन त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.